- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

सोने-चांदी
✔ २४ कॅरेट : १,२८,७०० /-
✔ २२ कॅरेट : १,१२,३५० /-
✔ चांदी : १,७८,३००/-

दैनिक
सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर संचालक-संपादक : अजय बिवडे

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

Reg. No : MHBIL/25/A4140 Mail Id : sinhvanivrutta@gmail.com दिनांक : शनिवार, २८ नोव्हेंबर २०२६ Epaper : epaper.sinhvani.com पृष्ठे : ४ वर्ष : १ अंक : ३४८ किंमत : २ रूपये

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

थोडक्यात

सलग दुसऱ्या दिवशी सोन्याच्या दरात वाढ

जळगाव : काही दिवसांच्या घसरणीनंतर आता सोन्याच्या दरात काही प्रमाणात वाढ होत असल्याचं दिसून येत आहे. सोने चांदी दरात अल्पशी वाढ झाली आहे. काल (गुरूवारी, ता २६) १२४००० रुपयांवर असलेल्या सोन्याच्या दरात एक हजार रुपयांची वाढ होऊन ते १२५००० वर जाऊन पोहोचले आहे, तर चांदीच्या दरात ही तीन हजार रुपयांची वाढ होऊन, काल (गुरूवारी,ता २६) असलेले १५२००० रुपयाचे दर आज (शुक्रवारी, ता. २७) १५५००० वर जाऊन पोहोचले आहे. दोन्ही दर जी एस टी शिवायचे आहेत. तर देशांतर्गत सराफा बाजारात आज (शुक्रवार, २७ नोव्हेंबर २०२६) सोन्याच्या किमतीत किरकोळ वाढ नोंदवली गेली आहे. कालच्या बंद भावाच्या तुलनेत आज देशभरात सोने प्रति १० ग्रॅम १० रुपयांनी महागले आहे. आज भारतीय बाजारात २४ कॅरेट शुद्ध सोन्याची किंमत १२,४८१ रुपये प्रति ग्रॅम म्हणजेच १,२४,८१० रुपये प्रति १० ग्रॅम आहे. तर, २२ कॅरेट सोन्याचा दर ११,४४१ रुपये प्रति ग्रॅम म्हणजेच १,१४,४१० रुपये प्रति १० ग्रॅम आणि १८ कॅरेट सोन्याचा भाव ९३६१ रुपये प्रति ग्रॅम म्हणजेच ९३६१० रुपये प्रति १० ग्रॅम नोंदवला गेला आहे. सराफा बाजाराच्या आकडेवारीनुसार, गुरुवारी (२६ नोव्हेंबर) २४ कॅरेट सोन्याची किंमत १,२४,८०० रुपये प्रति १० ग्रॅम होती. आज सकाळी बाजार उघडल्यावर यामध्ये १० रुपये प्रति १० ग्रॅमची हलकी तेजी पाहायला मिळाली.

डिलिमिटेशन विधेयकाला केंद्राची मंजुरी

दुरुस्तीसह मान्यता, लोकसभेच्या ५० टक्के जागा वाढणार, आता २५ वर्षांसाठी डिलिमिटेशन गोठवणार, ३३ टक्के महिला आरक्षणाचा प्रस्ताव

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

मतदारसंघ पुनर्रचना (डिलिमिटेशन) आणि महिला आरक्षणाशी संबंधित घटनादुरुस्ती विधेयकातील दुरुस्त्यांना केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. मोदींच्या कॅबिनेट मंत्रिमंडळाने मतदारसंघांच्या पुनर्रचनेशी (डिलिमिटेशन) संबंधित घटनादुरुस्ती विधेयकाला मंजुरी दिली. यामध्ये विविध राज्यांमधील जागांची संख्या ५० टक्क्यांनी वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला. राज्यांमध्ये जागांच्या वाटपाची सध्याची व्यवस्था पुढील २५ वर्षांपर्यंत म्हणजेच २०५१ पर्यंत कायम राहील.

या पार्श्वभूमीवर केंद्र सरकार आणत असलेल्या डिलिमिटेशन बिलाला पाठिंबा मिळावा यासाठी शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासोबत भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांनी संपर्क केला असल्याची माहिती आहे. पुढील काही दिवसांत हे बिल आणले जात आहे, त्यावेळी सर्व सहकार्य मिळावे, यासाठी हालचाली सुरू केल्या आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस (शप) पक्षाच्या नेत्यांसोबत संवाद करून शंका दूर करण्यात येणार असल्याची विश्वसनीय सूत्रांची माहिती आहे.

मोदी सरकारची आज मंत्रिमंडळ बैठक पार पडली. ही बैठक सुमारे ४० मिनिटे चालली. पंतप्रधान मोदींच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत संसदेच्या आगामी कामकाजावर चर्चा करण्यात आली. सूत्रांच्या माहितीनुसार बैठकीत डिलिमिटेशन बिल (परिसीमन विधेयक) मंजूर करण्यात आले. याव्यतिरिक्त महिला आरक्षणाशी संबंधित एक दुरुस्तीही मंजूर करण्यात आली. लोकसभेची बैठक ३० नोव्हेंबर रोजी तर राज्यसभेची बैठक २ डिसेंबर रोजी बोलावण्यात आली. दिल्ली पातळीवर आणि राज्य सरकारच्या पातळीवरती घडामोडींना वेग आला आहे,



भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी राष्ट्रवादीच्या नेत्यांना संपर्क केला असल्याची माहिती समोर आली.

महाराष्ट्रात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार यांच्या पक्षाशी आता भाजपचे वरिष्ठ नेते संपर्क साधत आहेत. याआधी देखील संपर्क करण्यात आला होता, हे विधेयक पास व्हावे, यासाठी भाजपकडून हालचाली सुरू झाल्या आहेत तर हे विधेयक पास करताना कोणकोणते पक्ष पाठिंबा देऊ शकतात, त्यांना संपर्क केला जात आहे तर या विधेयकाची माहिती जाणून घेतल्यानंतर त्याला पाठिंबा देण्याबाबत शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस सकारात्मक प्रतिसाद मिळत असल्याचे संकेत दिसून येत आहेत.

यासाठी संसदेचे चार दिवसीय अधिवेशन होणार आहे. यामध्ये महिला आरक्षण आणि मतदारसंघ पुनर्रचना विधेयक मांडले जाण्याची दाट शक्यता जात आहे. हे स्वतंत्र हिवाळी अधिवेशन नसून पावसाळी अधिवेशनाचाच पुढील भाग आहे. ३० नोव्हेंबरपासून लोकसभेचे तर २ डिसेंबरपासून राज्यसभेचे कामकाज सुरू होणार आहे तर ३ डिसेंबरला अधिवेशनाचा समारोप होणार आहे.

अद्याप अधिवेशनाच्या कामकाजाचा अजेंडा नाही

सरकारकडून अद्याप अधिवेशनाचा अधिकृत कामकाजाचा अजेंडा जाहीर झालेला नाही. अधिवेशन बोलावण्याच्या पद्धतीवरून घटनादुरुस्ती विधेयक आणण्याची सरकारची तयारी असल्याचे स्पष्ट संकेत यावरून दिसून येत आहेत.

आगामी काळात समीकरणे बदलणार

लोकसभेच्या सध्याच्या ५४३ जागांची संख्या वाढवून ८५० करण्याचा प्रस्ताव चर्चेत होता. आता सर्व राज्यांमध्ये जागा वाढविण्याच्या नव्या सूत्रामुळे राजकीय समीकरणांमध्येही मोठे बदल होण्याची शक्यता आहे.

दक्षिणी राज्यांच्या चिंता दूर करणार?

मतदारसंघ पुनर्रचनेच्या मुद्द्यावरून दक्षिण भारतातील राज्यांनी चिंता व्यक्त केली होती. लोकसंख्येच्या आधारावर मतदारसंघांची पुनर्रचना झाल्यास लोकसंख्या नियंत्रणात यश मिळवलेल्या दक्षिणेकडील राज्यांचे लोकसभेतील प्रतिनिधित्व कमी होण्याची भीती व्यक्त केली जात होती. हीच बाब लक्षात घेऊन सर्व राज्यांमध्ये लोकसभेच्या जागा ५० टक्क्यांनी वाढवण्याचा पर्याय पुढे आल्याचे मानले जात आहे.

महिला आरक्षण विधेयकात फेरबदल?

लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभांमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्याच्या उद्देशाने सरकार महिला आरक्षण कायद्यात दुरुस्ती करण्याच्या तयारीत आहे. यापूर्वी एप्रिलमध्ये लोकसभेत संविधान (१३१ वी दुरुस्ती) विधेयक, २०२६ मंजूर होऊ शकले नव्हते. त्यामुळे आता नव्या बदलांसह विधेयक मांडले जाण्याची शक्यता आहे.

विदर्भात ११ महिन्यांत ७५० शेतकऱ्यांच्या आत्महत्या

दै. सिंहवाणी वृत्त, यवतमाळ

शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी ५००० रुपये मदत देऊन तुम्ही त्यांना ५००० रुपयांत दिवाळी साजरी करा असे सांगता; प्रत्यक्षात अनेक शेतकऱ्यांना ही मदतही मिळालेली नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना माझा थेट प्रश्न आहे की, तुमची दिवाळी ५००० रुपयांत साजरी होते का? असा सवाल काँकरोच जनता पार्टीचे संस्थापक अध्यक्ष अभिजीत दिपके यांनी केला आहे.

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची विदारक परिस्थिती जाणून घेण्यासाठी सुरू केलेल्या पब्लिक अभियानांतर्गत त्यांनी यवतमाळ जिल्ह्यात शेतकऱ्यांशी संवाद साधला आणि जिल्हा परिषद शाळांची पाहणी करत सरकारच्या कारभाराचे वाभाडे काढले. विदर्भातील शेतकरी



आत्महत्यांच्या गंभीर मुद्द्यावरून अभिजित दिपके यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार निशाणा साधला. सरकार बड्या उद्योगपतींचे कोट्यवधी रुपयांचे कर्ज माफ करते, मात्र बळीराजाची कर्जमाफी करत नाही. एका बाजूला मदतीच्या नावाखाली शेतकऱ्यांची चेष्टा केली जात आहे, तर दुसरीकडे कर्जबाजारीपणाला कंटाळून शेतकरी मृत्यूला कवटाळत आहेत.

मुख्यमंत्र्यांनी अपयशाची नैतिक जबाबदारी स्वीकारावी

गेल्या अवघ्या ११ महिन्यांत एकट्या विदर्भात ७५० शेतकऱ्यांना आत्महत्या कराव्या लागल्या आहेत. राज्याचे मुख्यमंत्री स्वतः विदर्भाचे सुपुत्र असूनही त्यांचे लक्ष शेतकऱ्यांचे जीव वाचवण्याऐवजी कोल्हापूरच्या गोकुळ दूध डेअरीवर कब्जा कसा करता येईल याकडे आहे. एका शेतकऱ्याच्या आत्महत्येनंतरही मुख्यमंत्र्यांना आपले अपयश जाणवायला हवे. जर तुम्हाला गोकुळची दूध डेअरीच सांभाळायची असेल आणि गोकुळचे दूधच विकायचे असेल, तर तात्काळ मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देऊन खुर्ची खाली करा आणि शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेणाऱ्या नेत्याला मुख्यमंत्री होऊ द्या, असे आव्हान दिपके यांनी दिले.

स्वातंत्र्याच्या ८० वर्षांनंतरही पत्र्याच्या शाळा

पब्लिक अभियानांतर्गत अभिजित दिपके यांनी यवतमाळ जिल्ह्यातील धोत्रा येथील जिल्हा परिषदेच्या शाळेला भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी शाळेची दुरवस्था पाहून त्यांनी प्रशासनावर संताप व्यक्त केला. धोत्रा येथील जिल्हा परिषद शाळेत शिक्षकांची कोणतीही रिक्त राहिलेली नाही; शिक्षक दुपारी १२ वाजता शाळेत येतात आणि वेळ होण्यापूर्वीच केव्हाही निघून जातात.

वर्गात बांबू, स्वच्छतागृहांची दुरवस्था

शाळेत विद्यार्थ्यांसाठी स्वच्छ बाथरूमची सोय नाही; बाथरूमला ना छत आहे, ना दरवाजे. वर्गात चक्क बांबू ठेवलेले आहेत. देशाला स्वातंत्र्य मिळून ८० वर्षे पूर्ण होत आली तरी आजही ग्रामीण भागात पत्र्याच्या शेडमध्ये शाळा भरवाव्या लागत आहेत. ना शेतकऱ्यांसाठी काही होत आहे, ना शेतकऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी काही केले जात आहे. हे सरकार नेमके कोणासाठी काम करत आहे, याचे उत्तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना द्यावेच लागेल, असा इशारादही अभिजित दिपके यांनी दिला.

आयडीबीआय बँकेच्या खासगीकरणाला काँग्रेसचा विरोध

मुंबई : आयडीबीआय बँकेची परकीय भांडवलदारांना विक्री करण्याच्या केंद्र सरकारच्या निर्णयाविरोधात काँग्रेसने आक्रमक भूमिका घेतली आहे. या निर्णयाला विरोध करण्यासाठी बँकेचे



अधिकारी, कर्मचारी आणि विविध बँकांमधील कर्मचारी संघटनांची संयुक्त सभा शनिवार, २८ नोव्हेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता दादर येथील टिळक भवनात आयोजित करण्यात आली आहे.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, माजी खासदार कुमार केतकर, वरिष्ठ आर्थिक पत्रकार राजीव रंजन सिंग, ऑल इंडिया बँक ऑफिसर्स असोसिएशनचे सरचिटणीस एस. नागराजन आणि ऑल इंडिया आयडीबीआय ऑफिसर्स असोसिएशनह्रचे सरचिटणीस विठ्ठल कोटेश्वर राव या सभेला मार्गदर्शन करणार आहेत. काँग्रेसचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आयडीबीआय बँकेचा कॅनडास्थित फेअरफॅक्स फायनान्शिअल होल्डिंग्ज लिमिटेड सोबतच्या कराराला विरोध दर्शवला आहे. भारतीय वित्तीय क्षेत्रावरील परकीय भांडवलदारांचा वाढता प्रभाव रोखण्याची गरज असून बँक अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या संघर्षाला काँग्रेसचा पाठिंबा असल्याचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी स्पष्ट केले आहे. प्रदेश काँग्रेसच्या अर्थ विभागाचे प्रमुख विश्वास उटगी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या काही महिन्यांपासून या मुद्द्यावर जनजागृती मोहीम राबवली जात आहे. त्याचाच भाग म्हणून बँक अधिकारी, कर्मचारी तसेच प्रदेश काँग्रेसचे नेते आणि कार्यकर्ते यांची ही संयुक्त सभा होणार असल्याची माहिती विश्वास उटगी यांनी दिली.

वर्ध्यात राज्य राखीव पोलीस दलाच्या नव्या प्रशिक्षण केंद्रासाठी २८.७५ हे. आर. जमीन मंजूर

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा महत्वपूर्ण निर्णय

दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई

वर्धा जिल्ह्यातील पांढरकवडा येथे राज्य राखीव पोलीस दलाचे (एसआरपीएफ) नवे प्रशिक्षण केंद्र उभारण्यासाठी महसूल विभागाने २८.७५ हेक्टर आर शासकीय जमीन देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे.

मौजा पांढरकवडा (ता. व जि. वर्धा) येथील सर्व्हे क्रमांक ५५ मधील ही जमीन गृह विभागामार्फत समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्रमांक ४ (हिंगणा रोड, नागपूर) यांना प्रदान करण्यात आली आहे. महसूल मुक्त, सारामाफीने तसेच भोगाधिकार मूल्यरहित किमतीने भोगवटादार वर्ग-२ या धारणाधिकाराने ही जमीन देण्यात आली आहे.

या जमिनीच्या वापरासाठी शासनाने काही अटी व शर्ती निश्चित केल्या आहेत. जमिनीचा वापर केवळ मंजूर प्रयोजनासाठीच करावा लागणार असून, ताबा मिळाल्यापासून तीन वर्षांच्या आत बांधकामास सुरुवात करणे बंधनकारक राहील. तसेच शासनाच्या पूर्वमान्यतेशिवाय जमिनीची विक्री, हस्तांतरण किंवा पोटविभाजन करता येणार नाही आणि अटींचा भंग झाल्यास जमीन शासनजमा करण्याचा अधिकार शासनाकडे राहील. याविषयी बोलताना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, राज्यातील कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी पोलीस दलाचे प्रशिक्षण अद्ययावत असणे गरजेचे आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली वर्धा जिल्ह्यात राज्य राखीव पोलीस दलाच्या नव्या प्रशिक्षण केंद्रासाठी आवश्यक ती जमीन उपलब्ध करून देण्यात आली आहे. या केंद्रामुळे जवानांना दर्जेदार प्रशिक्षण मिळून राज्याच्या सुरक्षेला अधिक बळकटी मिळेल. नव्या प्रशिक्षण केंद्रामुळे वर्धा जिल्ह्यासह विदर्भातील पोलीस प्रशिक्षणाच्या सुविधांमध्ये मोठी भर पडणार असून, आगामी काळात सुरक्षा व्यवस्थेच्या दृष्टीने हा निर्णय उपयुक्त ठरणार आहे.

चंद्रपूरमध्ये नगरसेवकांचे मानधन दुप्पटीने वाढले

दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर

राज्यात एकीकडे दुष्काळ असतांना चंद्रपूर महानगर पालिकेच्या नगरसेवकांनी स्वतःचे मानधन दुप्पट केल्याची जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात होत आहे. चंद्रपूर महानगरपालिकेच्या आज आयोजित सर्वसाधारण सभेत भुयारी गटार योजना आणि अमृत-२ पाणीपुरवठा योजनेच्या मुद्द्यावरून नगरसेवकांमध्ये जोरदार गदारोळ पाहायला मिळाला. चंद्रपूर महानगरपालिका आणि गोंधळ हे समीकरण नेहमीचच झालं असतांना मात्र नगरसेवकांच्या मानधन वाढीचा विषय सभेत येताच सर्वच नगरसेवक गुण्यागोविंदाने एकत्र आल्याचे चित्र आज दिसून आले.

आमदार, खासदार किंवा राजकीय पुढारी सत्ताधारी आणि विरोधक म्हणून सातत्याने एकमेकांसमोर उभे असतात. अनेकदा विविध मुद्द्यांवरुन ते भांडत असतात, त्यांचे मतभेद चव्हाट्यावर येतात. मात्र, स्वतःसाठी काही मागायचं असेल तर त्यांचा एकोपा पाहायला मिळतो. मग, खासदारांच्या कँटीनचा विषय असो, आमदारांच्या पगारवाढीचा विषय असो किंवा आमदार निवास नव्याने बांधण्याचा विषय असो, सर्वजण एकमेकांना सपोर्ट करतात. चंद्रपूर महापालिकेतही आज अशाचप्रकारे निर्णय घेण्यात आला. येथील नगरसेवकांच्या मानधनात दुप्पटीने वाढ करण्यात आलीय. चंद्रपूर महानगरपालिकेच्या नगरसेवकांना आतापर्यंत दरमहा १० हजार रुपये मानधन दिले जात होते. मात्र, सर्वसाधारण सभेत मानधनवाढीच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आल्याने आता नगरसेवकांना दरमहा २० हजार रुपये मानधन मिळणार आहे. म्हणजेच नगरसेवकांचे मानधन थेट दुप्पट करण्यात आले आहे.

एक तर अमेरिका सोडा, नाहीतर नोकरी सोडा!

वृत्तसंस्था, न्यूयॉर्क

अमेरिकेत दुसऱ्यांदा डोनाल्ड ट्रम्प यांचे सरकार आल्यापासून अमेरिकेत राहणाऱ्या परदेशी नागरिकांवर वेगवेगळी संकटे येत आहेत. अमेरिकेतील एच-१ बी व्हिसाधारक कर्मचाऱ्यांसमोर आता नवे संकट ओढावले आहे. प्रसिद्ध आयबीएम कंपनीने कर्मचाऱ्यांना एक तर अमेरिका सोडा किंवा नोकरी सोडा असे फर्मान काढले आहे. कारण, आयबीएमने आपल्या कन्सल्टिंग विभागातील बहुतांश पदांसाठी अमेरिकी वर्क व्हिसा आणि ग्रीन कार्डसाठी प्रायोजकत्व देणे बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. कन्सल्टिंग विभागात १,५०,००० हून अधिक कर्मचारी कार्यरत आहेत. कंपनीच्या या निर्णयामुळे संबंधित विभागातील कर्मचाऱ्यांना ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत नोकरीचा राजीनामा द्यावा लागणार आहे. जर कंपनीत कायम राहायचे असेल, तर या कर्मचाऱ्यांना दुसऱ्या देशात स्थलांतरित व्हावे लागणार आहे. त्यामुळे या कर्मचाऱ्यांसमोर नोकरी गमावण्याची टांगती तलवार आहे. जे कर्मचारी दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरित न होता कंपनी सोडण्याचा पर्याय निवडतील, त्यांना तीन महिन्यांच्या पगाराइतकी नुकसानभरपाई दिली जाईल आणि ३१ डिसेंबर हा त्यांचा कामाचा शेवटचा दिवस असेल.

कौशल्यांची कमतरता भरून काढण्यासाठी आयबीएम कन्सल्टिंग अमेरिकेतील उच्च-कुशल कामगारांसाठीच्या व्हिसा कार्यक्रमांमध्ये सहभागी होते. कंपनीने अशा बहुतांश पदांसाठी व्हिसा आणि ग्रीन कार्ड प्रायोजकत्व देणे बंद करण्याचा निर्णय घेतला आहे, असे आयबीएमच्या प्रवक्त्याने सांगितले.

नोकरीच्या संधी अमेरिकेबाहेर

नोकरीच्या संधीही प्रामुख्याने अमेरिकेबाहेर आहेत. आयबीएमच्या करिअर पोर्टलवरील माहितीनुसार, अमेरिकेबाहेर कन्सल्टिंग पदांच्या १,२७८ जागा उपलब्ध असून यामध्ये भारतीय १,१२५, सिंगापूर २३ आणि युनायटेड किंगडममधील १८ जागांचा समावेश आहे. अमेरिका सोडून भारतात स्थलांतर केल्यास पगारात जवळपास ८० टक्क्यांपर्यंत कपात होऊ शकते.

संपादकीय लेखणीतून...

चिंता बळीराजाची

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथिगृह येथे राज्य मंत्रिमंडळाची महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत शेतकरी, विद्यार्थी, शिक्षक, कामगार आणि सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देणारे १४ मोठे निर्णय घेण्यात आले. यामध्ये पात्र शेतकऱ्यांना पुढील तीन महिने मोफत धान्य देण्यापासून ते नंदुरबारमधील सिंचन प्रकल्पासाठी कोट्यवधींच्या निधीपर्यंत अनेक महत्त्वाच्या प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. राष्ट्रीय सुरक्षा योजनेतील दारिद्ररेषेखालील परंतु थेट लाभ हस्तांतरण योजनेत (डीबीटी) समाविष्ट नसलेल्या राज्यातील ३३ जिल्ह्यांतील ४२ लाख ३० हजार ७८३ शेतकऱ्यांना पुढील तीन महिने प्रति व्यक्ती ५ किलो मोफत धान्य (३ किलो तांदूळ, २ किलो गहू) देण्याचा मोठा निर्णय सरकारने घेतला आहे. नंदुरबार जिल्ह्यातील नर्मदा-तापी वळण योजनेसाठी ५,५४८ कोटी रुपयांच्या तरतुदीस मान्यता देण्यात आली आहे.

सहा वळण बंधाऱ्यांमुळे २६,५२६ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार असून ११.५० मेगावॅट वीजनिर्मिती होणार आहे. विद्यार्थ्यांच्या वसतिगृह निर्वाह भत्त्यात वाढ करण्यात आली आहे. आरोग्य विधान व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांच्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेंतर्गत भोजन, निवास आणि निर्वाह भत्त्यात भरीव वाढ करण्यात आली आहे. सोलापूर-धाराशिव जिल्ह्यात चारा छावण्या उभारण्यात येणार आहेत. मराठवाड्यात पाणी आणि चारा टंचाईची परिस्थिती गंभीर आहे. जालना जिल्ह्यात अंबड, परतूर, बीडमध्ये शिरूर, गेवराई, आष्टी, छत्रपती संभाजीनगरमध्ये गंगापूर, कन्नड, खुलताबाद, पैठण, सिल्लोड, वैजापूर, धाराशिवमध्ये परंडा, लोहारा, उमरगा, तुळजापूर, सातारामध्ये खटाव, माण, फलटण, सांगली जिल्ह्यात आटपाडी, कवठेमहांकाळ, जत, अहिल्यानगर जिल्ह्यात नगर, पाथर्डी, जामखेड, शेवगाव, पारनेर या तालुक्यांत तीव्र चारा टंचाई आहे. सोलापूर आणि धाराशिव जिल्ह्यात चारा छावण्या सुरू करण्यास दुष्काळ निवारण मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.शालार्थ प्रणालीत समाविष्ट शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी आरबीआयकडे नोंदणीकृत बिगर बँकिंग वित्तीय संस्थांच्या माध्यमातून आर्थिक सक्षमीकरण सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. खासगी अनुदानित शाळांच्या नियमनासाठी सर्वसमावेशक असा महाराष्ट्र खासगी अनुदानित शाळा (विनियमन) विधेयक, २०२६च्या प्रारूपास मंजुरी देण्यात आली आहे. खासगी अनुदानित आयुर्वेद व युनानी महाविद्यालयांमधील पूर्णवेळ ग्रंथपालांना सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशींनुसार सुधारित वेतन संरचना लागू करण्यास मान्यता मिळाली आहे. महसूल विभागातील अर्धन्यायिक कामकाजासाठी रेव्हेन्यू कोर्ट केस मॅनेजमेंट सिस्टीम लागू होणार असून, एक जिल्हा एक अपील तरतुदीसाठी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मध्ये सुधारणा करण्यात येणार आहे. आर्थिक फसवणूक करणाऱ्या संस्थांच्या मालमत्ता जप्तीची प्रक्रिया जलद होणार आहे. त्यासाठी स्वतंत्र एमपीआयडी न्यायाधिकरण स्थापनेबाबत व ९० दिवसांच्या आत प्रकरण निकाली काढण्याची कालमर्यादा, त्यासाठी महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियमामध्ये सुधारणा करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.आज वाढत्या महागाईने सर्वसामान्य माणूस त्रस्त आहे. महागाई हा केवळ अर्थव्यवस्थेतील आकडेवारीचा विषय नसून रोजच्या जगण्याचा प्रश्न बनला आहे. श्रीमंतापेक्षा मध्यमवर्गीय व आर्थिक दुर्बल कुटुंबांना महागाईची झळ अधिक बसते. किराणा, भाजीपाला, दूध, तेल, गॅस, पेट्रोल-डिझेल आणि औषधांच्या वाढत्या किमतींमुळे आर्थिक नियोजन कोलमडते. महागाईचा दर ८.९४ टक्क्यांवर पोहोचल्याने सामान्य ग्राहकांची आर्थिक कोंडी अधिक गंभीर झाली आहे. आवश्यक वस्तूंच्या खरेदीतही कपात करावी लागत आहे. जागतिक अर्थव्यवस्थेत भारतीय अर्थव्यवस्थेने मुसंडी मारल्याच्या गप्पा आमचे पंतप्रधान मारतात. यात थोडी जरी वास्तविकता असती तर बळिराजाची सस्सेहोलपट झाली नसती. पंतप्रधान मोदी ५० कोटी लोकांना गरिबीतून बाहेर काढल्याचे सांगतात, मात्र बेरोजगारी आणि महागाई वाढत असताना विकासदरही सहा टक्क्यांवर आला आहे. श्रीमंतांच्या हातात पैसा केंद्रित झाला आहे. ५० कोटी लोक गरिबीतून बाहेर आले असतील, तर ८० टक्के जनतेला मोफत धान्य देण्याची गरज का भासावी?

मजुरीसाठी गर्भाशयाची आहुती : ऊस तोड महिलांचे भयावह वास्तव

महाराष्ट्रात दुष्काळाचे चटके पुन्हा तीव्र झाले असून शेतातील उभी पिके वाळत चालली आहेत. स्थानिक पातळीवर शेतीची कामे आटल्यामुळे जगण्याचा प्रश्न आ वासून उभा राहिला आहे आणि दरवर्षीप्रमाणे मराठवाड्यासह ग्रामीण भागातून ऊसतोड कामगारांचे तांडे साखर कारखान्यांच्या दिशेने स्थलांतर करू लागले आहेत. महाराष्ट्राच्या अर्थकारणात साखर उद्योगाला नेहमीच समृद्धीचे आणि सत्तेचे प्रतीक मानले जाते; परंतु या उद्योगाचा कणा असलेल्या ऊसतोड कामगारांच्या, विशेषतः महिलांच्या वाट्याला आजही कमालीची उपेक्षा, असुरक्षितता आणि शारीरिक शोषण येत आहे. पोटाची खळगी भरण्यासाठी सुरू झालेल्या या हंगामी स्थलांतराने आता मानवी हक्कांच्या आणि स्त्री आरोग्याच्या एका अत्यंत गंभीर संकटाचे रूप धारण केले असून, पुरोगामी म्हणवणाऱ्या राज्याच्या सामाजिक संवेदनशीलतेसमोर अनेक अस्वस्थ करणारे प्रश्न उभे केले आहेत.

या भयावह वास्तवाची पुनरावृत्ती जालना जिल्ह्यातील एका धक्कादायक सर्वेक्षणातून पुन्हा एकदा समाजासमोर आली आहे. न्यूज १८ मराठीसह विविध प्रमुख वृत्तमाध्यमांनी २९ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या वृत्तानुसार, एका खासगी संस्थेने केलेल्या सर्वेक्षणात जालना जिल्ह्यातील १०७ ऊसतोड कामगार महिलांनी केवळ मासिक पाळीमुळे मजुरी बुडू नये या भीतीपोटी स्वतःचे गर्भाशय काढून टाकल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. ऑगस्ट २०२५ ते ऑक्टोबर २०२६ या कालावधीत घडलेल्या या प्रकरणांमध्ये घनसावंगी तालुक्यातील ६३ आणि परतूर तालुक्यातील ४४ महिलांचा समावेश आहे. यापेक्षाही अधिक संतापजनक बाब म्हणजे, जालना जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने या १०७ महिलांच्या शस्त्रक्रियांबाबत कोणतीही अधिकृत नोंद नसल्याचे स्पष्ट केले आहे. ही घटना अचानक घडलेली नाही, तर २०१९ मध्ये बीड जिल्ह्यातील ८२,३०० महिलापैकी १३,८०० हून अधिक म्हणजेच सुमारे १६ ते १७ टक्के महिलांनी गर्भाशय काढल्याचे शासकीय अहवालातच सिद्ध झाले होते. त्यानंतरही २०२४ मध्ये बीडमध्ये ८४३ नवीन प्रकरणे समोर आली आणि आता जालन्यातील आकडेवारीने प्रशासकीय दाव्यांमधील पोकळपणा पूर्णपणे उघडा पाडला आहे.

कोणतीही स्त्री स्वतःच्या शरीराचा अत्यंत महत्त्वाचा अवयव सहजपणे काढून टाकण्याचा टोकाचा निर्णय घेत नाही; त्यामागे साखर कारखानदारीतील अन्यायी आर्थिक साखळी आणि कामाच्या ठिकाणची अमानुष परिस्थिती कारणीभूत आहे. ऊसतोड कामगार हंगाम सुरू होण्यापूर्वीच मुकादमांकडून आगाऊ उचल घेतात आणि ते कर्ज फेडण्यासाठी पती-पत्नीच्या जोडीला दररोज दोन ते तीन टन ऊस तोडावाच लागतो.

मासिक पाळीच्या चार ते पाच दिवसांत काम थांबले तर रोजंदारी बुडते, मुकादमाचा दंड बसतो आणि कर्जाचा डोंगर अधिकच वाढत जातो. त्यातच उघड्या माळरानावर उसाच्या पाचटापासून बनवलेल्या तात्पुरत्या झोपड्यांमध्ये राहणाऱ्या या महिलांसाठी स्वच्छतागृहे, अंघोळीची सोय, स्वच्छ पाणी किंवा सॅनिटरी पॅड्स यांसारख्या किमान मूलभूत सुविधांचा पूर्णतः अभाव असतो. या आर्थिक विवंचनेचा आणि अज्ञानाचा गैरफायदा अनेक खासगी रुग्णालये घेतात. भविष्यातील गंभीर आरोग्यविषयक दुष्परिणामांची कल्पना न देता या शस्त्रक्रिया उरकल्या जातात, ज्यामुळे पुढे संप्रेरक असंतुलन, हाडे कमकुवत होणे, सांधेदुखी आणि दीर्घकालीन वेदना यांचा सामना या महिलांना करावा लागतो; परिणामी मजुरी वाचवण्यासाठी घेतलेला हा निर्णय त्यांना आयुष्यभराच्या औषधोपचाराच्या नव्या आर्थिक खाईत लोटतो.

या गंभीर प्रश्नावर शासन आणि न्यायव्यवस्थेने वेळोवेळी पावले उचलली असली, तरी कागदावरील योजना आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी यात मोठी दरी असल्याचे दिसून येते. राज्य शासनाने १३ सप्टेंबर २०१९ रोजी लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाची स्थापना केली, तसेच स्थलांतरित कामगारांच्या मुलांसाठी इयत्ता पाचवी ते पदव्युत्तर शिक्षणापर्यंत निवासाची सोय करणारी संत भगवानबाबा शासकीय वसतिगृह योजना सुरू केली. मात्र राज्यात मंजूर ८२ वसतिगृहांपैकी प्रत्यक्षात केवळ १७ वसतिगृहेच कार्यरत आहेत; बीडमधील ११ वसतिगृहांसाठी फेब्रुवारी २०२६ मध्ये १५९ कोटींहून अधिक निधी मंजूर झाला असला तरी कामगारांची नोंदणी अद्याप अपूर्ण आहे. आरोग्य तपासणीसाठी मार्च ते मे २०२५ दरम्यान बीडमध्ये ५०,१५८ महिलांची तपासणी झाली, २० ते ३० मजुरांमागे किमान सातवी शिकलेल्या एका महिलेची निवड करून सुमारे १४०० महिलांचा आरोग्य साथी उपक्रम राबवला गेला आणि मार्च २०२६ मध्ये अनावश्यक शस्त्रक्रिया रोखण्यासाठी राज्य व जिल्हास्तरीय समित्यांची पुनर्रचनाही करण्यात आली.

दुसरीकडे, मुंबई उच्च न्यायालयाने मार्च २०२३ मध्ये स्वेच्छा जनहित याचिका दाखल करून घेत डॉ. नीलम गोऱ्हे समितीच्या शिफारशी लागू करण्याचे निर्देश दिले, १९६८ मधील कोल्हापूर शुगर मिल्स निकालाच्या आधारे या मजुरांना कारखान्याचे कामगार मानण्यावर भर दिला आणि जून २०२५ मध्ये पाच महिन्यांपेक्षा जास्त काळाच्या गर्भवती महिलांना ऊसतोडणीस नेण्यास कठोर बंदी घातली. तरीही खासगी रुग्णालयांवरील ढिलाई आणि प्रशासकीय उदासीनतेमुळे या सर्व उपाययोजना शेवटच्या महिलेपर्यंत पोहोचण्यात अपयशी ठरत आहेत.

या संपूर्ण प्रकरणाची सर्वात वेदनादायी बाजू म्हणजे राजकीय इच्छाशक्तीचा अभाव आणि वर्षानुवर्षे सुरू असलेले केवळ आश्वासनांचे राजकारण. ज्या ऊसतोड कामगारांच्या कष्टावर, मतांवर आणि श्रद्धेवर अनेक राजकीय घराण्यांनी पिढ्यान्पिढ्या सत्ता उपभोगली, त्याच नेतृत्वाने संकटाच्या काळात या कष्टकरी वर्गाला वाऱ्यावर सोडल्याची तीव्र भावना आज ग्रामीण भागात उमटत आहे.

खासदार फौजिया खान यांनी ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी या प्रकाराबर चिंता व्यक्त करत सखोल चौकशीची, थकीत मजुरी तातडीने देण्याची आणि आर्थिक मदत पात्र हजार रुपयांवरून एक लाख रुपये करण्याची मागणी केली आहे; त्याचबरोबर जालन्याच्या पालकमंत्री पंकजा मुंडे आणि राज्य प्रशासनाने आता केवळ तात्पुरत्या समित्या न नेमता ठोस कृती करण्याची नितांत गरज आहे. अनावश्यक शस्त्रक्रिया करणाऱ्या खासगी रुग्णालयांवर कठोर फौजदारी कारवाई, साखर कारखान्यांवर कामाच्या ठिकाणी स्वच्छतागृहे व आरोग्यसुविधांची कायदेशीर सक्ती आणि कामगारांची १०० टक्के पारदर्शक नोंदणी झाल्याशिवाय हे दुष्टचक्र थांबणार नाही. आपण रोज सकाळी चहाच्या कपात जो साखरेचा गोडवा चाखतो, त्यामागे मराठवाड्यातील शेकडो कष्टकरी महिलांच्या शरीराची आणि सन्मानाची जखम दडलेली आहे, याचे भान समाज आणि सत्तेने वेळीच राखले तरच या शोषणाला खऱ्या अर्थाने पूर्णविराम मिळेल. साखरेचा गोडवा निर्माण करणाऱ्या ऊसतोड महिलांच्या आयुष्यात मात्र वेदना, शोषण आणि आरोग्याची परवड कायम राहणे ही पुरोगामी महाराष्ट्रासाठी अत्यंत लज्जास्पद बाब आहे.

मजुरी बुडू नये म्हणून महिलांना गर्भाशय काढण्यासारखा टोकाचा निर्णय घ्यावा लागणे, हे केवळ आरोग्याचे नव्हे तर मानवी हक्कांचे आणि सामाजिक न्यायाचे गंभीर अपयश आहे. शासनाने कागदी योजना आणि चौकशी समित्यांच्या पलीकडे जाऊन दोषींवर कठोर कारवाई, आरोग्यसुविधांची हमी, सुरक्षित कामाचे वातावरण आणि आर्थिक संरक्षण उपलब्ध करून द्यावे. साखर उद्योगाची समृद्धी महिलांच्या आरोग्याची आणि स्त्रीसन्मानाची किंमत मोजून साधली जात असेल, तर त्या विकासाला कोणताही नैतिक आधार उरत नाही. साखरेचा खरा गोडवा कारखान्यांच्या उत्पादनात नव्हे, तर ऊसतोड महिलांच्या जीवनात सन्मान, आरोग्य आणि सुरक्षितता निर्माण करण्यात आहे.

- ९५६१५१४३०६

महात्मा फुले यांचे "स्त्री विषयक विचार"

सौ. मनीषा सोन्कर / सोनकांबळे

संत- महात्मे व थोर विचारवंतांच्या महाराष्ट्राच्या पावन भू- मध्ये शिक्षण प्रेमी असे एक मौल्यवान चमचमते रत्न जन्माला आले. त्या रत्नाचे नाव आहे "महात्मा ज्योतिबा फुले". महात्मा फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ साली झाला. त्यांचे मुळ गाव सातारा जिल्ह्यातील कटगुण हे होते. महात्मा फुले यांचे पूर्ण नाव "ज्योतीराव गोविंदराव फुले" होते. महात्मा फुले हे एक महान समाजसुधारक, विचारवंत, शिक्षणप्रेमी, सामाजीद्धारक होते. त्यांनी अखेरपर्यंत सामाजिक समता, बंधुता व समानतेसाठी लढा, शिक्षणाचा लढा आणि शेकऱ्यांच्या प्रश्नांवर भर दिला. सत्यशोधक समाजाची स्थापना करून त्यांनी अस्पृश्यता व जातीय भेदभाव या गोष्टींना आळा घातला. त्यांचे विचार समाजातील सर्व स्तरावरील खुप मोठे परिवर्तन घडवीणारे होते. समाजात पसरलेल्या व पसरविलेल्या सर्व वाईट, कु-प्रथा, अंधश्रद्धा, चालीरिती, रूढी, परंपरा, अस्पृश्यता, वर्णभेद, जातीयता अशा सर्व गोष्टींना शिक्षणाच्या माध्यमातून विरोध करत समाज परिवर्तन करून सामाजिक समानता निर्माण केली. महात्मा फुले यांच्यासाठी स्त्री शिक्षण हा खुप महत्वाचा विषय होता. समाजातील सर्व स्तरातील लोकांना शिक्षण मिळावे यासाठी ते आयुष्यभर लढत राहिले.

स्त्री शिक्षण इतका महत्वाचा विषय हाती घेत त्यांनी सावित्रीबाई फुले यांना शिक्षणाचे धडे देत मुलींसाठी भारतातील पहिली शाळा सुरु करून शिक्षणातील नवक्रांती घडवून आणली. आणि स्त्री शिक्षणाचा पाया मजबूत केला. स्त्री शिक्षणाचा ऐतिहासिक वारसा या चळवळीतून उभा राहिला. सावित्रीबाईंच्या सोबतीने स्त्री शिक्षणाची खुप मोठी चळवळ उभारली. आणि अनेक संकटे, अडचणी, संघर्ष, यातना सोसत स्त्री शिक्षणाची चळवळ यशस्वी करुन दाखवली. समाजात स्त्रियांविरोधात बऱ्याच अनिष्ट चालीरिती निर्माण केल्या गेल्या होत्या. त्या चालीरिती हाणून पाडत व बालविवाहास विरोध करून बालविवाह रोखण्याचे कार्य केले. स्त्रियांना पुनर्विवाहाचे स्वातंत्र्य मिळवून देत पाठिंबा दिला. जोपर्यंत स्त्रिया शिक्षण घेणार नाहीत तोपर्यंत त्यांचा सर्वांगीण व सर्वांगिक विकास होणार नाही अशी त्यांची शुद्ध विचारसरणी होती.

अनादी काळापासून स्त्रियांचे जगणे चुलमूल यातच बंदिस्त होते. स्त्री घराचा उंबरठा ओलांडून बाहेर जाणे जणू तिच्यासाठी पापच होते. बालवयात लग्न, मुलं, चुलमूल, वाडा, रांधा, उष्टी, खरकटी काढा एवढेच तिच्या नशिबी होते. पण, महात्मा फुलेंनी सावित्रीबाईंना शिक्षणाचे धडे गिरविण्यास शिकविले आणि समाजातील सर्व स्तरातील स्त्रिया लिहायला वाचायला लागल्या. प्रत्येक स्त्री जोपर्यंत शिक्षण घेणार नाही तोपर्यंत समाज, प्रथा, चालीरिती, रूढी स्त्रीला ताठ मानेने जगू देणार नाहीत. म्हणून स्त्रियांनी शिक्षण घेऊन स्वावलंबी व्हावे. अशी शुद्ध विचारसरणी होती महात्मा फुले यांची.

आज स्त्रिया कुठून कुठवर पोहोचल्या आहेत. स्त्रियांनी सगळी क्षेत्रे काबीज केली आहेत. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून स्त्रिया प्रत्येक कार्य क्षेत्रात पुढे वा अग्रेसर आहेत. स्त्रियांनी सगळी यशोशिखरे गाठली आहेत. रूढी परंपरांची साखळदंड तोडून ती स्वतंत्र झाली आहे. केवळ शिक्षणामुळे. सावित्रीबाई फुले यांनी स्वतःच्या अंगावर शेणाचे वार सोसत स्त्रि शिक्षणाचा वडा चालुच ठेवला. म्हणूनच स्त्रियांचा खऱ्या अर्थाने उद्धार झाला.

स्त्रियांना ज्या जाचक रूढी व परंपरेच्या बेड्यांनी साखळदंडानी बांधून ठेवले होते त्या बेड्या शिक्षणामुळेच तोडता आल्या. महात्मा फुलेंनी अगदी त्यांच्या आडनावा प्रमाणेच शिक्षण रुपी सुंदर, मोहक फुले समाजातील सर्व स्तरातील स्त्रियांच्या ओंजळीत दिली. आणि त्या फुलांचा मनमोहक सुगंध दुरवर जाऊन पसरला. तो सुगंध म्हणजेच आजची शिकलेली, शिकत असलेली प्रत्येक स्त्री. स्त्रियांच्या नशिबी असलेली चुलमुलाची, उंबरठ्याच्याच आत जगण्याची, राहण्याची सक्ती महात्मा फुले यांच्या पुढाकारामुळे नष्ट करण्यात आली.

महात्मा फुलेंनी स्त्रियांसाठी, स्त्रियांच्या प्रगतीसाठी पावलोपावली क्रांती केली. आणि स्त्री शिक्षणातील अशी क्रांती घडविली की, झोक्यातील मुलांच्या पाळण्याच्या दोरी सोबत पाटी-कलमही हाती आली. शिक्षणाची नवी दिशा आणि शिक्षणाचा लौकिक उभ्या जगाने बघितला. महात्मा फुलेंनी मुली, बायका यांच्या ओंजळीत शिक्षणाची ती सुगंधी फुले दिली त्या फुलांचा सुगंध जगभर पसरला. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले यांचे आयुष्य काट्याने भरले होते. पण, तरी शिक्षणाची न बुडणारी नाव बनून शिक्षणाच्या विशाल सागरात नाव चालती ठेवली.

खाईस्टचर्च कसोटीसाठी संघ निवडताना गौतमचा हट्टीपणा कायम राहणार की संघहिताचा निर्णय घेणार?

भाग-२

डॉ. दत्ता विघावे
क्रिकेट समीक्षक

वॉशिंग्टन सुंदर की रवींद्र जडेजा?

फिरकी गोलंदाजीचा मुद्दाही तितकाच महत्त्वाचा आहे. वेलिंग्टनमध्ये वॉशिंग्टन सुंदरला प्राधान्य देण्यात आले; मात्र त्याने सामन्यात ११० धावांच्या मोबदल्यात केवळ एक बळी मिळवला. त्याची फलंदाजी उपयुक्त असली तरी कसोटी संघात त्याची निवड केवळ फलंदाजीच्या अतिरिक्त आधारासाठी केली जात आहे का, याचे उत्तर संघव्यवस्थापनाने द्यायला हवे. दुसरीकडे रवींद्र जडेजा हा अनुभवी अष्टपैलू खेळाडू आहे. त्याची गोलंदाजी, फलंदाजी आणि क्षेत्ररक्षण या तिन्ही बाबी संघाला संतुलन देऊ शकतात. न्यूझीलंडमधील वेगवान खेळपट्टीवर फिरकीपटूची भूमिका मर्यादित असली तरी सामन्याच्या चौथ्या-पाचव्या दिवशी त्याचे महत्त्व वाढू शकते. मग जडेजाला सातत्याने संधी देण्याबाबत अनिश्चितता का? वॉशिंग्टनला केवळ फलंदाजीतील उपयुक्ततेमुळे प्राधान्य आणि जडेजाला गोलंदाजीतील अपेक्षित कामगिरीच्या कसोटीवर मोजणे, हा दुहेरी निकष ठरू नये. आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे कुलदीप यादवला संघातून मुक्त करून मायदेशात देशांतर्गत क्रिकेट खेळण्यासाठी पाठवण्यात आले. त्याच्या जागी गुरनूर ब्रारचा समावेश झाला. आता कुलदीप उपलब्ध नसल्यामुळे फिरकीचा पर्याय मर्यादित झाला आहे. हा निर्णय योग्य की अयोग्य, यावर चर्चा होऊ शकते; परंतु संघव्यवस्थापनाने उपलब्ध खेळाडूंचा अधिक परिणामकारक वापर करणे आवश्यक आहे.

फलंदाजीमध्येही केवळ नावाचा दबदबा नको

भारतीय फलंदाजीची ताकद कागदावर मोठी आहे. शुभमन गिल, यशस्वी जयस्वाल, के. एल. राहुल, साई सुदर्शन, देवदत्त पडिक्कल, रिषभ पंत आणि ध्रुव जुरेल असे पर्याय उपलब्ध आहेत. मात्र कसोटी क्रिकेटमध्ये केवळ नाव मोठे असून चालत नाही; परिस्थितीशी जुळवून घेण्याची क्षमता आणि संघाला संकटातून बाहेर काढण्याची तयारी महत्त्वाची असते. यशस्वी जयस्वालकडून आक्रमक सुरुवातीची अपेक्षा आहे. के. एल. राहुलकडे अनुभव आहे. शुभमन गिलने कर्णधार म्हणून जबाबदारीने फलंदाजी करणे आवश्यक आहे. रिषभ पंतची आक्रमकता प्रतिस्पर्ध्यांच्या रणनितीला धक्का देऊ शकते. मात्र आक्रमकता आणि बेजबाबदार फटकेबाजी यांतील फरक प्रत्येक फलंदाजाने ओळखला पाहिजे. वेलिंग्टनमधील अनिर्णित सामन्यानंतर फलंदाजांनीही आत्मपरीक्षण करणे आवश्यक आहे. मोठी भागीदारी उभारणे, प्रतिस्पर्ध्यांच्या गोलंदाजांना थकवणे आणि सामन्यावर पकड निर्माण करणे ही कसोटी फलंदाजीची खरी परीक्षा आहे.

खाईस्टचर्चची खेळपट्टी भारतासाठी संधी की आव्हान?

खाईस्टचर्चचा हेगली ओव्हल मैदानाचा इतिहास वेगवान गोलंदाजांच्या बाजूने आहे. येथे झालेल्या १५ कसोटी सामन्यांमध्ये एकूण ४८४ बळींपैकी ४४४ बळी वेगवान गोलंदाजांनी मिळवले आहेत. म्हणजेच तब्बल ९१.७ टक्के बळी वेगवान गोलंदाजांच्या खात्यात जमा झाले आहेत. त्यामुळे येथे चार वेगवान गोलंदाजांसह उतरण्याची भारताची भूमिका योग्य ठरू शकते. मात्र चार वेगवान गोलंदाज निवडणे आणि त्यांचाकडून प्रभावी गोलंदाजी करून घेणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. नव्या चेंडूचा योग्य वापर, सातत्यपूर्ण टप्पा, स्विंग, अतिरिक्त उसळी आणि जुन्या चेंडूवर रिव्हर्स स्विंगचा प्रयत्न या गोष्टी निर्णायक ठरणार आहेत. न्यूझीलंडच्या फलंदाजांना त्यांच्या घरच्या मैदानावर कमी लेखण्याची चूक भारताने करू नये. टॉम लॅथम, डेव्हॉन कॉनवे, विल यंग, डॅरिल मिचेल, हेन्री निकोल्स आणि रचिन रवींद्र यांच्याकडे भारतीय गोलंदाजीला आव्हान देण्याची क्षमता आहे. शिवाय मिचेल सँटनर दुखापतीमुळे मालिकेतून बाहेर असला तरी न्यूझीलंडची फलंदाजी आणि वेगवान गोलंदाजी दुर्लक्षित करता येणार नाही.

माझ्या मते संघनिवडीचा प्राधान्यक्रम काय असावा?

खाईस्टचर्चच्या परिस्थितीचा विचार करता भारताने चार वेगवान गोलंदाज आणि एका प्रमुख फिरकी अष्टपैलू खेळाडूसह मैदानात उतरावे. संभाव्य संघरचना : - यशस्वी जयस्वाल, के. एल. राहुल, शुभमन गिल (कर्णधार), देवदत्त पडिक्कल, रिषभ पंत, (यष्टिरक्षक), रवींद्र जडेजा, वॉशिंग्टन सुंदर, जसप्रीत बुमराह, मोहम्मद सिराज, आकाशदीप, गुरनूर ब्रार.

ही माझी परिस्थितीनुसार सुचवलेली संघरचना आहे; अंतिम निवड खेळपट्टीचा प्रत्यक्ष अंदाज, खेळाडूंची तंदुरुस्ती आणि सरावातील कामगिरी पाहून करावी. विशेषतः गुरनूर ब्रारला पदार्पणाची संधी द्यायची की अनुभवी प्रसिद्ध कृष्णाला कायम ठेवायचे, हा निर्णय महत्त्वाचा ठरेल. त्याचप्रमाणे जडेजा आणि वॉशिंग्टन या दोघांना खेळवण्याची गरज आहे का, याचाही विचार झाला पाहिजे. माज्या मते सिराजला संघात स्थान मिळणे अत्यंत आवश्यक आहे. बुमराह-सिराज ही अनुभवी जोडी नव्या चेंडूने न्यूझीलंडच्या फलंदाजांवर दबाव आणू शकते. त्यांना साथ देण्यासाठी आकाशदीप आणि परिस्थितीनुसार गुरनूर किंवा प्रसिद्ध यांच्यापैकी एकाची निवड करता येईल.

कर्णधार शुभमन गिल आणि प्रशिक्षक गंभीर यांची जबाबदारी

या सगळ्या चर्चेत एक महत्त्वाचा मुद्दा दुर्लक्षित करता येणार नाही. संघनिवड ही केवळ प्रशिक्षकाची वैयक्तिक मक्तेदारी नाही.

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com / ई-पेपर : epaper.sinhvani.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

'भूलभिंगरी'त नात्यांमधील भावनिक गुंतागुंत; 'अल्पविराम'मधून कौटुंबिक जबाबदाऱ्यांचे वास्तव

६५ व्या राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेत दोन नाटकांचे प्रभावी सादरीकरण

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांच्या वतीने आयोजित ६५ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेत शुक्रवारी भूलभिंगरी आणि अल्पविराम या दोन नाटकांचे सादरीकरण करण्यात आले. डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात सुरू असलेल्या या स्पर्धेत दोन्ही नाटकांनी मानवी नात्यांमधील भावनिक गुंतागुंत, एकटेपणा आणि कौटुंबिक जबाबदाऱ्यांचे वास्तव प्रभावीपणे उलगडले. हेमेंदू रंगभूमी, नागपूर प्रस्तुत आणि रजनीश जोशी लिखित



भूलभिंगरी या नाटकाचे दिग्दर्शन सौरभ कांबळे यांनी केले. प्रेम, महत्त्वाकांक्षा, एकटेपणा आणि मालकीभाव यांचा वेध घेणारे हे नाटक मानवी मनाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकते. या नाटकाचे संगीत अंशुल नागदेवे, प्रकाशयोजना साहिल वाघमारे, रंगभूषा व वेशभूषा पंथाली रामटेके आणि नेपथ्य रिया सहारे यांनी सांभाळले.

दुसरे नाटक रुखमाई सेवा मंडळ, नागपूर प्रस्तुत इरफान मुजावर लिखित आणि सकेत महाजन दिग्दर्शित अल्पविराम हे होते. आई-वडिलांनी आयुष्यभर मुलांसाठी केलेला त्याग आणि त्यांच्या वृद्धापकाळात मुलांनी पार पाडायची जबाबदारी हा संवेदनशील विषय या नाटकातून मांडण्यात आला. भावना आणि व्यवहार यांच्यातील द्वंद्वातून नाटकातील भावनिक ताण अधिक गडद झाला.

या नाटकात संकल्प पायाळ यांनी माधव, सार्थक पांडे यांनी मिहीर, तर सागर देशपांडे यांनी लकीची भूमिका साकारली. तिन्ही कलाकारांनी भावांमधील नातेसंबंध, भावनिक गुंतागुंत आणि वैचारिक संघर्ष अभिनयातून प्रभावीपणे उभा केला. आई-वडिलांनी मुलांसाठी केलेल्या त्यागाची जाणीव करून देतानाच त्यांच्या वृद्धापकाळात मुलांनी पार पाडायच्या कर्तव्यांवर विचार करायला लावणारे हे नाटक ठरले.

या नाटकाचे संगीत नेहा पायाळ, नेपथ्य उन्मेश देशपांडे आणि वेशभूषा नेत्रा रेटर यांनी केले. प्रकाशयोजनेची जबाबदारी संकेत महाजन यांनी सांभाळली. अभिजित कुंभारकर यांनी सूत्रधाराची भूमिका पार पाडली. निर्मिती सहाय्य हेमंत जिचकार आणि विलास कुबडे यांचे लाभले.

फोन करताच राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांचा प्रतिसाद, पोकलॅन्ड आले व ताडपत्री बंधारे बांधले : मुरलीधर तांबुलकर



दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू :मौदा

यंदा महाराष्ट्रात अत्यल्प पाऊस झाल्याने अनेक तालुके दुष्काळग्रस्त घोषित झाले आहेत. त्यात मौदा तालुक्याचाही समावेश आहे. दुष्काळाची दाहकता कमी करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने जलसंवर्धन व जलसंधारण ची कामे युद्ध पातळीवर सुरू केलेली आहे. महाराष्ट्र शासन व आर्ट ऑफ लिविंग यांच्या माध्यमातून मौदा तालुका सह जिल्ह्यात व नंतर संपूर्ण महाराष्ट्रात नाले व नद्यांवर ताळपत्री बंधारा बनविण्याचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे व होणार आहे. ज्या शेतकऱ्याच्या शेताजवळील नाल्यावर किंवा गावातील नदीवर किंवा नाल्यावर ताडपत्री बंधारे बनवायचे असल्यास त्या शेतकऱ्यांनी किंवा त्या गावातील सरपंचांनी फोन करावे, असे आव्हान राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्यातर्फे करण्यात आले होते. ग्रा प खरडा सरपंचा वैशाली मुरलीधर तांबुलकर यांनी गावातील नाल्यावर ताडपत्री बंधारा बनवण्यासाठी राज्यमंत्री जयस्वाल यांना फोन करताच, राज्यमंत्री जयस्वाल यांच्या सकारात्मक प्रतिसाद मिळाला व गावातील नाल्यावर ताडपत्री बंधारे बनविण्यासाठी पोकलॅन्ड मशीन आले व बंधारे बनविण्यात आले.

त्यामुळे बंधाऱ्यात पाणी साठवले असून त्या पाण्याचा उपयोग शेतकरी त्यांच्या शेतातील रब्बी पिकाला, गावातील गुराढोरांना होणार आहे. या बंधाऱ्यात साठवलेल्या पाण्यामुळे गावातील शासकीय, खाजगी विहीर व बोरवेल यांची पाण्याची पातळी उन्हाळ्यात जास्त खोलवर जाणार नाही. त्यामुळे खरडा येथील सामाजिक कार्यकर्ते तथा भाजपा तालुका मंडळ उपाध्यक्ष मुरलीधर तांबुलकर यांच्यासह गावातील शेतकरी व नागरिकांनी राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांचे आभार मानणारा व्हिडिओ मुरलीधर तांबुलकर यांनी नुकताच सोशल मीडियावर वायरल केलेला आहे.

मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी २८ व २९ नोव्हेंबरला विशेष नोंदणी शिबिरे

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर : भारत निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम (रक्ष) २०२६ अंतर्गत मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी मतदारांना पुन्हा एक संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. वासाठी २८ व २९ नोव्हेंबर रोजी दक्षिण-पश्चिम नागपूर विधानसभा मतदारसंघातील सर्व मतदान केंद्रांवर विशेष नोंदणी शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाच्या पहिल्या टप्प्यात मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांनी घरोघरी भेटी देऊन मतदारांची माहिती संकलित केली होती. या प्रक्रियेदरम्यान अनुपस्थित, स्थलांतरित, मृत, अन्यत्र नोंदणी असलेले आणि इतर अशा प्रवर्गात वगीकृत झालेल्या मतदारांची नावे प्रारूप मतदार यादीतून वगळण्यात आली होती. त्यानंतर ३१ ऑगस्ट २०२६ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली.

ज्या मतदारांच्या घरी अद्याप बीएलओ पोहोचलेले नाहीत, अशा मतदारांनी या शिबिरांचा लाभ घेऊन आपले गणना पत्र बीएलओंच्यामार्फत भरून घ्यावे. ज्या मतदारांना ऑनलाइन पद्धतीने गणना पत्र भरायचे आहे, त्यांनी भारत निवडणूक आयोगाच्या https://voters.eci.gov.in या अधिकृत संकेतस्थळाला भेट देऊन ऑनलाइन प्रक्रिया पूर्ण करावी. दक्षिण-पश्चिम नागपूर विधानसभा मतदारसंघातील सर्व संबंधित मतदारांनी विशेष नोंदणी शिबिरात सहभागी होऊन अंतिम मतदार यादीत आपले नाव समाविष्ट करून घेण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

नोकरीच्या आमिषाने फसवणूक करणाऱ्यांपासून दूर राहण्याचे एनटीपीसीचे नागरिकांना आवाहन

दै. सिंहवाणी वृत्त, मौदा

एनटीपीसीच्या नावाने बनावट नियुक्ती पत्रे जारी करून आणि नोकरी देण्याचे आमिष दाखवून फसवणूक करणारे नागरिकांकडून पैसे मागत असल्याची प्रकरणे समोर आली आहेत. या घटनांच्या पार्श्वभूमीवर, एनटीपीसी मौदा प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आणि अशा फसव्या कारवायांपासून स्वतःचे संरक्षण करण्याचे आवाहन केले आहे. एनटीपीसी प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, त्यांची भरती प्रक्रिया अत्यंत विहित आणि पारदर्शक पद्धतीने राबवली जाते. एनटीपीसीमध्ये नोकरी देण्याच्या नावाखाली कोणाकडूनही पैसे मागण्यासाठी किंवा स्वीकारण्यासाठी कोणत्याही



व्यक्तीला, संस्थेला, सल्लागाराला किंवा मध्यस्थाला अधिकृत केलेले नाही. सर्व अधिकृत भरती अधिसूचना केवळ एनटीपीसीच्या अधिकृत करिअर पोर्टलवर, त्यांच्या वेबसाइटच्या करिअर विभागात आणि इतर अधिकृत संवाद माध्यमांद्वारे प्रसिद्ध केल्या जातात.

नागरिकांना भरतीसंदर्भात मिळालेल्या कोणत्याही माहितीची सत्यता पडताळून पाहण्याचा सल्ला देण्यात आला आहे. त्यांनी आपली वैयक्तिक, आर्थिक किंवा गोपनीय माहिती अनोळखी व्यक्तींसोबत शेअर करू नये. जर कोणाला संशयास्पद नियुक्ती पत्र, नोकरीची ऑफर किंवा पैशांची मागणी आली, तर त्यांनी तात्काळ मानव संसाधन विभाग, मौदा सुपर थर्मल पॉवर स्टेशन, प्रशासकीय इमारत, रामटेक रोड, मौदा, नागपूर, महाराष्ट्र - ४४११०४ येथे संपर्क साधावा. तसेच, त्यांनी जवळच्या पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवावी.

प्रशासनाने नागरिकांना पुढे असेही आवाहन केले आहे की, अशा फसव्या कारवायांच्या तपासासाठी आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे, पत्रव्यवहार, आर्थिक व्यवहारांच्या नोंदी आणि संपर्क तपशील जपून ठेवावेत. अशा कारवायांमुळे होणाऱ्या कोणत्याही आर्थिक नुकसानीस एनटीपीसी मौदा जबाबदार राहणार नाही, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. ही जाहीर सूचना जनजागृतीसाठी आणि नागरिकांना रोजगार-संबंधित फसवणुकीला बळी पडण्यापासून सावध करण्यासाठी जारी करण्यात आली आहे.

३० वर्षांपासून रखडलेल्या मेंढला-उमठा पांधन रस्त्याचा अखेर मार्ग मोकळा!

आमदार चरणसिंग ठाकूर यांच्या पुढाकाराने ३ किलोमीटर रस्त्याच्या कामाला सुरुवात; निवडणुकीत दिलेला शब्द केला पूर्ण, मेंढला गावात आनंदाचे वातावरण

दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड

मेंढला ते उमठा या दोन गावांना जोडणारा गेल्या तब्बल ३० वर्षांपासून रखडलेला पांधन रस्ता अखेर मार्गी लागला आहे. आमदार चरणसिंग ठाकूर यांच्या पुढाकाराने या ३ किलोमीटर पांधन रस्त्याच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात झाल्याने मेंढला गावासह परिसरातील शेतकरी आणि नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या रस्त्याचा प्रश्न सुटण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडले आहे.

मेंढला-उमठा पांधन रस्त्याची मागणी गेल्या तीन दशकांपासून सातत्याने केली जात होती. मात्र, विविध कारणांमुळे हा रस्ता रखडला होता. त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना शेतीच्या कामासाठी ये-जा करताना तसेच शेतीमालाची वाहतूक करताना अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. विशेषतः पावसाळ्याच्या दिवसांत या मार्गावरून प्रवास करणे जिकिरीचे होत होते. रस्त्याअभावी शेतकऱ्यांचे मोठे हाल होत होते.

विधानसभा निवडणुकीदरम्यान आमदार चरणसिंग ठाकूर यांनी मेंढला येथील नागरिकांना हा पांधन रस्ता मार्गी लावण्याचा शब्द दिला होता. निवडणुकीत दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतल्याने आता ३ किलोमीटर रस्त्याच्या कामाला सुरुवात झाली आहे. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये समाधान व्यक्त होत असून, तीस वर्षांची प्रतीक्षा संपण्याची आशा निर्माण झाली आहे. या रस्त्यामुळे मेंढला आणि उमठा या गावांमधील संपर्क अधिक सुलभ होणार असून शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी, शेतीसाठी लागणारे साहित्य आणण्यासाठी तसेच शेतमाल बाजारपेठेत पोहोचविण्यासाठी मोठा दिलासा मिळणार आहे. ग्रामीण भागातील दळणवळण सुधारण्यासोबतच शेतीच्या विकासालाही या रस्त्याचा फायदा होणार आहे.

गेल्या ३० वर्षांपासून प्रलंबित असलेला प्रश्न मार्गी लावण्यासाठी आमदार चरणसिंग ठाकूर यांनी घेतलेल्या पुढाकाराचे मेंढला ग्रामस्थांकडून स्वागत करण्यात येत आहे. आता या तीन किलोमीटर रस्त्याचे काम दर्जेदार पद्धतीने आणि निर्धारित वेळेत पूर्ण व्हावे, अशी अपेक्षा शेतकरी व नागरिक व्यक्त करीत आहेत. निवडणुकीत दिलेला शब्द प्रत्यक्ष विकासकामातून पूर्णत्वास जात असल्याने मेंढला गावात समाधानाचे वातावरण



आहे.

शेतकऱ्यांच्या प्रतिक्रिया :

१) सुरेश गांगडे, शेतकरी : "मेंढला-उमठा पांधन रस्त्याची मागणी आम्ही गेल्या ३० वर्षांपासून करीत होतो. रस्ता नसल्यामुळे शेतीच्या कामासाठी ये-जा करताना अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. आता या रस्त्याच्या कामाला सुरुवात झाल्याने मोठा दिलासा मिळाला आहे. आमदार चरणसिंग ठाकूर यांनी दिलेला शब्द पूर्ण करण्यासाठी पुढाकार घेतल्याबद्दल समाधान वाटते."

२) तुकाराम सातपुते, शेतकरी : "शेतकऱ्यांसाठी रस्ता ही अत्यंत महत्त्वाची गरज आहे. पावसाळ्यात या मार्गावरून जाणे कठीण होत होते. शेतीमालाची वाहतूक करतानाही अडचणी येत होत्या. तब्बल तीन दशकांनंतर या रस्त्याचे काम सुरू झाल्याने शेतकऱ्यांची मोठी समस्या दूर होणार आहे."

३) रमेश चंपतराव चरपे, शेतकरी : "अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला मेंढला-उमठा पांधन रस्त्याचा प्रश्न आता मार्गी लागत आहे, ही आनंदाची बाब आहे. विधानसभा निवडणुकीच्या वेळी आमदार चरणसिंग ठाकूर यांनी दिलेले आश्वासन पूर्ण करण्याच्या दृष्टीने काम सुरू केले. हा रस्ता पूर्ण झाल्यानंतर परिसरातील शेतकऱ्यांना शेतीच्या कामासाठी मोठी सोय होणार आहे."

४) गोपाल चौधरी, शेतकरी : "३ किलोमीटरच्या या पांधन रस्त्यामुळे मेंढला आणि उमठा परिसरातील शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार आहे. रस्त्याअभावी अनेक वर्षे आम्हाला गैरसोयी सहन कराव्या लागल्या. आता कामाला सुरुवात झाल्याने आनंद होत आहे. रस्त्याचे काम लवकरात लवकर आणि चांगल्या दर्जाचे पूर्ण व्हावे, हीच अपेक्षा आहे."

थोडक्यात

इंदिरा गांधी उच्च प्राथमिक शाळेत संविधान दिन उत्साहात साजरा

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन; विद्यार्थ्यांनी घेतली संविधान मूल्यांच्या जतनाची शपथ



दै. सिंहवाणी वृत्त, वाडी

भारतीय संविधान दिनानिमित्त गुरुवार, २६ नोव्हेंबर २०२६ रोजी इंदिरा गांधी उच्च प्राथमिक शाळेत संविधान दिन मोठ्या उत्साहात आणि देशभक्तीपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे तसेच भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे पूजन करून करण्यात आली. शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. नितू खोब्रागडे यांच्या हस्ते प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित शिक्षक व विद्यार्थ्यांनी संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन केले. तसेच संविधानातील मूल्यांचे जतन व संवर्धन करण्याची शपथ घेतली.

याप्रसंगी मुख्याध्यापिका नितू खोब्रागडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना भारतीय संविधानाचे महत्त्व, नागरिकांचे मूलभूत अधिकार, कर्तव्ये आणि लोकशाही मूल्यांची माहिती दिली. संविधानाने प्रत्येक नागरिकाला दिलेले अधिकार समजून घेण्यासोबतच कर्तव्यांचे पालन करणेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षक प्रशांत तलमले, नितेश कोरे, राजेंद्र तीनखेडे, विद्या चकोले, नेहा इटनकर, सुनीता तुरणकर आणि ज्योती रामटेके यांच्यासह इतर शिक्षकांनी विशेष सहकार्य केले. कार्यक्रमाला शाळेतील सर्व शिक्षकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संविधान दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये संविधानाविषयी जागरूकता आणि लोकशाही मूल्यांची जाणीव निर्माण झाली.

राजू पारवेंच्या मध्यस्थीने सवाई यांचे आमरण उपोषण मागे

मोखेबर्डी उपसा सिंचन कालव्याला शाखा कालवा देण्याची मागणी; मुख्यमंत्र्यांकडे प्रश्न मांडणार



दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर

गोसेखुर्द प्रकल्पांतर्गत मोखेबर्डी उपसा सिंचन कालव्यातून शेतीच्या सिंचनासाठी शाखा कालवा उपलब्ध करून देण्याच्या मागणीसाठी भगवानपूर येथील सुनील सवाई यांनी सुरू केलेले आमरण उपोषण चौथ्या दिवशी मागे घेतले. माजी आमदार राजू पारवे यांच्या पुढाकाराने आणि मध्यस्थीने आंदोलनाची सांगता झाली. शेतीला सिंचनासाठी पाणी उपलब्ध व्हावे, या मागणीसाठी सवाई यांनी अन्नत्याग आंदोलन सुरू केले होते. चार दिवसांपासून सुरू असलेल्या या आंदोलनाची दखल घेत माजी आमदार राजू पारवे यांनी उपोषणस्थळी भेट देत संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याशी चर्चा करून हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. त्यानंतर सवाई यांनी उपोषण मागे घेतले.

यावेळी संजय गांधी निराधार योजना समितीचे अध्यक्ष सुभाष राऊत, माजी उपसरपंच विजय भुसारी, आदित्य भुसारी, गोलू मुंगले, संदीप भुसारी, हरिश्चंद्र चौधरी, दादू सवाई, मनोहर सवाई, उत्तमराव चौधरी, आंभोरा उपसा सिंचन विभागाचे कार्यकारी अभियंता प्रशांत गोडे, नायब तहसीलदार मनोज वाडे आदी उपस्थित होते.

पारशिवनी येथे भारतीय संविधान दिन उत्साहात साजरा; रक्तदान शिबिर व संविधान जागर कार्यक्रमाचे आयोजन

दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी

२६ नोव्हेंबर भारतीय संविधान दिनानिमित्त पारशिवनी येथील रमाई बौद्ध विहार व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ भारतीय बौद्ध महासभा व समता सैनिक दल यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान दिन मोठ्या उत्साहात व दिमाखात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास तालुका तहसीलदार प्रमुख पाहुणे सुरेश वाघचौरे, पारशिवनी पोलीस निरीक्षक किशोर शेरकी, नगर पंचायत मुख्याधिकारी नितीन लुंगे, नगराध्यक्षा सुनीताताई प्रकाशजी डोमकी, नगरसेवक तुषार पाटील, माणिक मेश्राम, सभापती रोशन पिंपळामुळे, नगरसेविका बबिताताई बर्वे, बाघाडे ताई, तरार ताई, खुबालकर ताई, डॉ. इरफान सर, भारतीय बौद्ध महासभा तालुका अध्यक्ष नानाजी गजभिये, समता सैनिक दल तालुका अध्यक्षा रीना नदेश्वर, सचिन सोमकुंवर, ज्ञानेश्वर लोखंडे, पुणदास गजभिये, नरेंद्र भिमटे, मुनेश दुपारे, केशव पाटील भिमराव लांजेवार, प्रतिभा ताई दुपारे, वंदना खडसे ताई, गणवीर सर, बंटी बोरकर, रंजीत रंगारी, विनोद रंगारी, चेतन सोमकुंवर, सिद्धार्थ थुल,सुदेश मेश्राम,कांजी शेंडे, अजय गजभिये, शोभा बाई गजभिये, नथू खोब्रागडे, हरिभाऊ लांजेवार, उपस्थित होते. प्रारंभी भगवान बुद्ध व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे व पुतळ्याचे माल्यार्पण आणि दीपप्रज्वलन करून विनम्र अभिवादन करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांना समता सैनिक दलाच्या वतीने मानवंदना देण्यात आली. भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे (प्रस्तावनेचे) सामूहिक वाचन करून संविधान दिन साजरा करण्यात आला. संविधान दिनानिमित्त उपस्थित मान्यवरांनी संविधानाचे महत्त्व, मूलभूत हक्क व कर्तव्ये यावर मोलाचे मार्गदर्शन केले. यानंतर 'संविधान जागर' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले, तसेच सामाजिक बांधिलकी जपत भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कल्याण अडकणे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार भारतीय बौद्ध महासभा नागपूर जिल्हा सचिव चंद्रकुमार बोरकर यांनी मानले.

थोडक्यात

तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनीत जनता विद्यालय, मौदाचे घवघवीत यश



दै. सिंहवाणी वृत्त, मौदा

शिक्षण विभाग, पंचायत समिती मौदा (जि. प. नागपूर) तर्फे आयोजित '५४ व्या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनी २०२६-२७' मध्ये येथील जनता विद्यालय, मौदाच्या शिक्षक व विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. ही स्पर्धा दिनांक २७ नोव्हेंबर २०२६ रोजी सेंट रोसेल्ली स्कूल, माथनी येथे उत्साहात पार पडली. या कार्यक्रमाला शिक्षणाधिकारी लीना वालोदे तसेच शिक्षण विस्तार अधिकारी ललिता चामट आणि संकेत मरसकोल्हे यांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रदर्शनीत जनता विद्यालयातील शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी विविध गटांत आपले कौशल्य सिद्ध करत यश मिळवले. माध्यमिक शिक्षक गट: शैलेशकुमार चंदनकर यांनी प्रथम क्रमांक पटकावला.

प्राथमिक शिक्षक गट: वर्षा राऊत यांनी प्रथम क्रमांक पटकावला. माध्यमिक विद्यार्थी गट: रमण दामोदर केवट या विद्यार्थ्याने द्वितीय क्रमांक पटकावला असून, त्याला शिक्षक संजयकुमार तुळशीकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या नेत्रदीपक यशाबद्दल शाळा व्यवस्थापन, मुख्याध्यापक अनिल मेश्राम, उपमुख्याध्यापक नामदेव तांबडे, उपप्राचार्य मधुकर बाभरे, पर्यवेक्षक यशवंत मस्के, सर्व शिक्षकवृंद आणि विद्यार्थ्यांकडून सर्व विजेत्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले असून, पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

खैरलांजी येथे २८ नोव्हेंबरला मंडईनिमित्त मराठी लावणी डान्स कार्यक्रमाचे आयोजन

कार्तिक पौर्णिमा पंचमीनिमित्त मंडईचे आयोजन

दै. सिंहवाणी वृत्त, तुमसर

भंडारा जिल्ह्यातील तुमसर तालुक्यातील खैरलांजी येथे खास कार्तिक पौर्णिमा पंचमी निमित्ताने भव्य मराठी लावणी डान्स कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार, दिनांक २८ नोव्हेंबर २०२६ रोजी रात्री ९ वाजता या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, परिसरातील नागरिकांसाठी हा विशेष सांस्कृतिक कार्यक्रम आकर्षणाचे केंद्र ठरणार आहे. कार्यक्रमाचे स्थळ खैरलांजी बस स्टॉप, खैरलांजी, पो. मोहगाव खुर्द, ता. तुमसर, जि. भंडारा असे निश्चित करण्यात आले आहे. या कार्यक्रमात मराठी लावणी नृत्याची विशेष मेजवानी रसिकांना अनुभवायला मिळणार आहे.

या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन समस्त ग्रामवासी खैरलांजी यांच्या वतीने करण्यात आले आहे. कार्यक्रमाला परिसरातील नागरिक, महिला, युवक व लावणीप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

रेती तस्करांना पोलिसांचा दणका, ३०.४५ लाखांचा हायवा जप्त

दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर

गडचिरोलीहून नागपूरच्या दिशेने रेतीची अवैध वाहतूक जोरात सुरु असल्याचे पोलिसांनी केलेल्या कारवाईमुळे शुक्रवारी पुन्हा एकदा सिद्ध झाले. तहसील टी-पॉइंटवर सापळा रचून पोलिसांनी रेतीने भरलेला हायवा ट्रक पकडला. या कारवाईत ट्रक आणि नऊ ब्रास रेती असा एकूण ३० लाख ४५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी चालकासह वाहनमालकाविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. २७ नोव्हेंबर रोजी पोलीस गस्तीवर असताना गडचिरोलीकडून नागपूरकडे हायवा ट्रकमधून रेतीची चोरटी वाहतूक होत असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. पोलिसांनी येथील तहसील टी-पॉइंट चौकात नाकाबंदी केली. यावेळी एमएच ४० डीके ७७७३ क्रमांकाचा हायवा ट्रक पोलिसांच्या जाळ्यात अडकला.



वाहनाची तपासणी केली असता त्यात नऊ ब्रास रेती आढळून आली. ट्रकचालक रोहित उत्तम सोनवणे (वय २६, रा. हळदगाव, ता. उमरेड) याच्याकडे रेती वाहतुकीचा परवाना मागितला असता, त्याच्याकडे कोणताही वैध परवाना नसल्याचे स्पष्ट झाले. वाहनमालक मौसम सुधाकर मैंद (वय २९, रा. आरमोरी, जि. गडचिरोली) याच्या सांगण्यावरून गडचिरोली येथून रेती आणत असल्याची कबुली चालकाने दिल्याचे पोलिसांनी सांगितले. पोलिसांनी हायवा ट्रक आणि रेती असा ३० लाख ४५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी संबंधित आरोपींविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

सावित्रीबाई फुले आधार व स्वयंम योजनेंतर्गत प्रवेशासाठी १० डिसेंबरपर्यंत मुदतवाढ

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना आणि पंडित दीनदयाळ उपाध्याय स्वयंम योजनेंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये लाभ घेण्यासाठी नवीन प्रवेशित प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी १० डिसेंबर २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

जिल्ह्यातील इतर मागास, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवगातील पात्र विद्यार्थ्यांनी या मुदतवाढीचा लाभ घेऊन विहित वेळेत प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी. संबंधित शैक्षणिक संस्थांनी मुदतवाढीची नोंद घेऊन आवश्यक कार्यवाही करावी, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहाय्यक संचालक यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी श्री. स्वप्नील येमुरले (९३५९९२०५९२) यांच्याशी संपर्क साधावा.

प्रत्येक थेंबाचे पाणी अडवून त्याचे नियोजन करा : नितीन गडकरी

'अॅग्रोव्हिजन २०२६' व जलपरिषदेचे थाटात उद्घाटन



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

घरातील पाणी घरात, शेतातील पाणी शेतात आणि गावात पडणारा पाऊस त्याच गावात साठविण्याचे नियोजन झाले पाहिजे. पाण्याचा एकही थेंब वाया जाऊ देऊ नका. प्रत्येक थेंबाला संघटित करून जलसाठा वाढविणे आवश्यक आहे, असे मत केंद्रीय मंत्री व अॅग्रोव्हिजनचे प्रवर्तक नितीन गडकरी म्हणाले.

'दुष्काळाचा सामना: पाणी व्यवस्थापन आणि पीक नियोजन' या मध्यवर्ती संकल्पनेवर आधारित मध्य भारतातील सर्वात मोठे कृषी प्रदर्शन 'अॅग्रोव्हिजन २०२६' आणि जलपरिषदेचे उद्घाटन शुक्रवारी केंद्रीय मंत्री व अॅग्रोव्हिजनचे मुख्य प्रवर्तक नितीन गडकरी यांच्या अध्यक्षतेखाली झाले. त्यावेळी ते बोलत होते.

अमरावती रोडवरील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या मैदानावर पार पडलेल्या या सोहळ्यात जलपरिषदेचे उद्घाटन मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी मंचावर कृषी राज्यमंत्री आशिष जयस्वाल, माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार, आयसीआरआयएसएटीचे महासंचालक डॉ. हिमांशु पाठक, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ व माफसूच्या कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर, अॅग्रोव्हिजन सल्लागार समितीचे अध्यक्ष डॉ. सी. डी. मायी, आयोजन सचिव रवी बोरटकर व रमेश मानकर उपस्थित होते.

सिंचनाचा अभाव, कापसाचा वाढता उत्पादन खर्च आणि शेतकऱ्यांचा आर्थिक अडचणी दूर करण्याच्या उद्देशाने १७ वर्षांपूर्वी या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली होती, असे सांगताना नितीन गडकरी यांनी शेतकरी केवळ अन्नदाता न राहता ऊर्जादाता, इंधनदाता आणि हायड्रोजनदाता होण्याचे त्यावेळी पाहिलेले स्वप्न पूर्ण होताना पाहताना समाधान होत असल्याचे सांगितले.

शेतीचा उत्पादन खर्च कमी करून उत्पादन वाढविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आवश्यक आहे. पुढील अॅग्रोव्हिजनपूर्वी किमान पाच हजार शेतकऱ्यांपर्यंत कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञान पोहोचविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. शेतकऱ्यांना प्रशिक्षण, ज्ञान आणि आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध करून देऊन त्यांचा आत्मविश्वास वाढविणे, हे अॅग्रोव्हिजनचे उद्दिष्ट आहे. शेतकऱ्यांच्या मुलांना रोजगार मिळावा आणि एकाही शेतकऱ्याला आत्महत्येची वेळ येऊ नये, यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज असल्याचेही गडकरी यांनी नमूद केले.

नदीतील गाळ काढून तो रस्ते बांधकामासाठी विना रॉयल्टी वापरण्यास परवानगी देणारा शासन निर्णय बिहार सरकारने काढला आहे. संजय राठोड यांनी आज केलेल्या मागणीनुसार महाराष्ट्र सरकार सोबतही असा करार करण्यात येईल, असे आश्वासन नितीन गडकरी यांनी दिले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी रवी बोरटकर यांनी प्रास्ताविकातून अॅग्रोव्हिजनच्या इतिहासाचा आणि भविष्यातील वाटचालीचा आढावा घेतला. डॉ. सी. डी. मायी यांनी स्वागतपर भाषण केले. यावेळी ऊस लागवड प्रक्रियेवर आधारित पुस्तकाचे प्रकाशन नितीन गडकरी यांच्या हस्ते करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते यावेळी कृषी प्रदर्शनीचेदेखील उद्घाटन करण्यात आले. रेणुका देशकर आणि नितीन कुळकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सी. डी. मायी यांनी आभार मानले.

खासदार कृपाल तुमाने, आमदार राजीव पोतदार, आमदार संजय भेंडे, परिणय फुके, चरणसिंग ठाकूर, आमदार संजय मेश्राम, महिंद्रा अँड महिंद्राचे फार्म डिव्हीजनचे सीईओ हर्ष कुमार, महाराष्ट्र वॉटर रिसोर्सेस रेग्युलेटरी ऑथरिटीच्या चेअरमन श्वेताली ठाकरे, नागपूर विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. अखिलेश पेशवे, कॅ. डॉ.एल.बी. कलंत्री, सुधीर दिवे, आनंदराव राऊत, डॉ. पिनाक दंदे, नितीन कुळकर्णी, समय बनसोड आणि अॅग्रोव्हिजन फाउंडेशनचे सर्व सदस्य उपस्थित होते.

अॅग्रोव्हिजन शेतकरी प्रगतीचे इंजिन : आशिष जयस्वाल

अॅग्रोव्हिजन हे शेतकऱ्यांचा प्रगतीचे इंजिन ठरले असून, नकारात्मकतेचे सकारात्मकतेत रूपांतर करण्याचे काम या उपक्रमाने केले आहे, असे कृषी राज्यमंत्री आशिष जयस्वाल म्हणाले. तामसवाडा पॅटर्नने जलसंवर्धनाच्या कामाला नवी प्रेरणा दिली असून, राज्यात मोठ्या प्रमाणावर नाला खोलीकरण आणि जलसंधारणाची कामे सुरू आहेत. ताडपत्री बंधाऱ्यांच्या प्रयोगामुळे गव्हाच्या पिकाला मोठा लाभ झाला आहे, असे ते म्हणाले.

शेतकऱ्यांनी बंधाऱ्यांचे पालकत्व स्वीकारावे : संजय राठोड

शेतीचे उज्वल भविष्य घडविण्यासाठी नवनवीन प्रयोग आणि जलसंधारणाला प्राधान्य देणे आवश्यक आहे, असे जलपरिषदेचे उद्घाटक संजय राठोड म्हणाले. शासनाकडून अनेक बंधारे बांधण्यात येतात; मात्र देखभालीअभावी त्यांची पाणी अडविण्याची क्षमता कमी होते. त्यामुळे शेतकऱ्यांनी या बंधाऱ्यांचे पालकत्व स्वीकारावे आणि त्यांची देखभाल करावी, असे आवाहन त्यांनी केले. बिहार सरकारसोबत जसा जलसंधारण कामासाठी जसा सामंजस्य करार केला तसा महाराष्ट्र सरकारसोबतही करावा, अशी विनंती त्यांनी नितीन गडकरी यांनी केली.

एनटीपीसी येथे अन्नत्याग आमरण उपोषण करणाऱ्या आंदोलकांना वीरेंद्र पायतोडे व खेमराज चाफले यांचा पाठिंबा

दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू: मौदा

एनटीपीसी मौदा येथील गेट क्रमांक २ वर १५० प्रकल्पग्रस्तांना नोकरीवर कायम करण्यासाठी मौदा नगरपंचायत चे नगराध्यक्ष प्रसन्ना (राजा) तिडके यांच्या नेतृत्वात गट ग्रामपंचायत धामणगाव चे सरपंच अक्षय पंचबुधे, एकनाथ वडे, तेजराम मोटघरे, सचिन मोटघरे, राकेश वाघमारे, शुभम जुमळे, दिनेश आकरे ,विनोद तिजारे, कैलास मोटघरे, विनोद लांजेवार २० नोव्हेंबर पासून अन्नत्याग आमरण उपोषण करीत आहे.



त्यांच्या या उपोषणाला तारसा धामणगाव जिल्हा परिषद सर्कलचे भाजपचे भावी प्रबळ उमेदवार,भारतीय जनता युवा मोर्चा मौदा तालुक्याचे प्रभारी, जिल्हा युवा मोर्चा उपाध्यक्ष विरेंद्र पायतोडे, चाचेर निमखेडा सर्कलचे भाजपचे भावी प्रबळ उमेदवार माजी पंचायत समिती मौदा उपसभापती खेमराज चाफले या दोघांनी उपोषण स्थळाला भेट देऊन पाठिंबा दर्शविला आहे. मागील सात दिवसापूर्वी पासून या उपोषण स्थळाला पालकमंत्री तथा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राज्यमंत्री आशिष जयस्वाल, माजी आमदार टेकचंद सावरकर, भाजपा जिल्हाध्यक्ष रामटेक ग्रामीण आनंदराव राऊत,भाजपा तालुका मौदा मंडळ अध्यक्ष भगवान बावनकुळे, शिवसेना तालुकाध्यक्ष नितेश वांगे, मौदा भाजपा शहराध्यक्ष तथा नगरसेवक रमेश कुंभलकर, नगरसेवक मोरेश्वर सोरते,माजी भाजपा मौदा तालुकाध्यक्ष मुकेश अग्रवाल सह तालुक्यातील, जिल्ह्यातील राजकीय व सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर भेटी देत असून आपला पाठिंबा जाहीर करीत आहेत.

मात्र अजूनही एनटीपीसी प्रशासनाने दखल घेतली नसून, आज शुक्रवार (ता.२७ नोव्हेंबर)ला उपोषण सुरूच आहे. उपोषणस्थळी एनटीपीसी अधिकाऱ्यांचे पुतळे जाळणे, प्रतीकात्मक प्रेतयात्रा काढणे व इतरही लोकशाही मार्गाने आंदोलन सुरू आहेत. या उपोषण व आंदोलनाची धग आता संपूर्ण तालुक्यात पसरली असून जिल्ह्यातील, राज्यातील व केंद्रातील लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांकडे पोहोचल्याने संपूर्ण मौदा तालुकावासियांचे लक्ष या अन्नत्याग आमरण उपोषणाकडे वेधलेले आहे.

जनता विद्यालय मौदा येथे संविधान दिवस



दै. सिंहवाणी वृत्त, मौदा

येथील जनता विद्यालय, मौदा येथे भारतीय संविधान दिवस मोठ्या उत्साहात व देशभक्तीपर वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे उपमुख्याध्यापक नामदेव तांबडे हे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून पंकज पिसे आणि ज्येष्ठ शिक्षक दिलीपकुमार इंगोले यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात संविधानाच्या उद्देशिकेच्या सामूहिक वाचनाने झाली. विद्यार्थिनी अन्वी डोंगरे आणि प्रगती चहादि यांनी संविधानाचे वाचन केले. याप्रसंगी विद्यालयातील विद्यार्थी छायांक जेठुमल, यश सायसे आणि तन्मू पौनीकर यांनी आपली मनोगते व्यक्त करत भारतीय संविधानाचे महत्त्व, नागरिकांचे मूलभूत हक्क आणि कर्तव्ये यावर प्रकाश टाकला.

अध्यक्षीय भाषणातून उपमुख्याध्यापक नामदेव तांबडे तसेच प्रमुख पाहुणे पंकज पिसे आणि ज्येष्ठ शिक्षक दिलीपकुमार इंगोले यांनी विद्यार्थ्यांना संविधानातील मूल्यांची जपणूक करण्याचे आणि एक जबाबदार नागरिक बनण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भाग्यश्री लाडे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार सुनील वैद्य यांनी मानले. या कार्यक्रमाला विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पाणीटंचाईचे संकट ओळखून एसडीओ मैदानात; नरखेड तालुक्यातील चार गावांची प्रत्यक्ष पाहणी!

उमठा, सायवाडा, साखरखेडा व अंबाडा येथे पाणीपुरवठ्याचा घेतला आढावा; दुरुस्तीची कामे तातडीने पूर्ण करण्याचे अधिकाऱ्यांना निर्देश



दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड

नरखेड तालुक्यात आगामी काळात उद्भवू शकणाऱ्या संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने आतापासूनच उपाययोजनांना गती दिली आहे. नागरिकांना उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागू नये, यासाठी काटोलचे उपविभागीय अधिकारी पियुष चिवंडे यांनी नरखेड तालुक्यातील पाणीटंचाईग्रस्त गावांचा प्रत्यक्ष पाहणी दौरा करून पाणीपुरवठा व्यवस्थेचा सविस्तर आढावा घेतला.

उमठा, सायवाडा, साखरखेडा आणि अंबाडा या गावांना भेट देत त्यांनी उपलब्ध जलस्रोतांची स्थिती जाणून घेतली. तसेच पाणीपुरवठा योजनांमधील त्रुटी दूर करून दुरुस्तीची कामे तातडीने पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले. या पाहणी दौऱ्यादरम्यान उपविभागीय अधिकारी चिवंडे यांनी गावांतील सार्वजनिक विहिरी, हातपंप, विंधन विहिरी (बोअरवेल), नळ पाणीपुरवठा योजनांचे स्रोत तसेच परिसरातील उपलब्ध जलसाठ्यांची प्रत्यक्ष पाहणी केली. केवळ कागदोपत्री आढावा न घेता प्रत्यक्ष गावात जाऊन पाणीपुरवठ्याची परिस्थिती समजून घेण्यावर त्यांनी भर दिला. ज्या ठिकाणी पाणीपुरवठा योजनांमध्ये तांत्रिक अडचणी आहेत किंवा हातपंप व विहिरींची दुरुस्ती आवश्यक आहे, अशा कामांना प्राधान्य देऊन तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

पाणीटंचाईवर मात करण्यासाठी आतापासूनच नियोजन

उन्हाळ्याच्या दिवसांत पाण्याची मागणी वाढत असल्याने उपलब्ध जलस्रोतांचे योग्य नियोजन करणे आवश्यक आहे. गावातील कोणताही नागरिक पिण्याच्या पाण्यापासून वंचित राहणार नाही, याची दक्षता प्रशासनाने घ्यावी. बंद असलेले हातपंप, नादुरुस्त पाणीपुरवठा यंत्रणा आणि तांत्रिक अडचणी असलेल्या योजनांची माहिती घेऊन त्यांची दुरुस्ती वेळेत पूर्ण करावी. तसेच आवश्यक ठिकाणी पर्यायी पाणीपुरवठ्याचे नियोजन करून संभाव्य टंचाईचा सामना करण्यासाठी यंत्रणा सज्ज ठेवावी, अशा सूचना यावेळी देण्यात आल्या.

ग्रामस्थांशी संवाद साधून अडचणी जाणून घेतल्या

पाहणीदरम्यान उपविभागीय अधिकाऱ्यांनी स्थानिक ग्रामपंचायत पदाधिकारी, ग्रामसेवक, तलाठी आणि ग्रामस्थांशी थेट संवाद साधला. गावनिहाय पाणीपुरवठ्याच्या समस्या, उपलब्ध पाण्याचे स्रोत, नागरिकांना भेडसावणाऱ्या अडचणी आणि आवश्यक उपाययोजनांची माहिती जाणून घेतली. पाणीपुरवठा विभाग, महसूल विभाग, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत यांनी परस्पर समन्वय ठेवून कामे करावीत, जेणेकरून ऐन उन्हाळ्यात पाणीटंचाईची परिस्थिती गंभीर होणार नाही, यावर भर देण्यात आला.

प्रशासनाच्या हालचालींना वेग

नरखेड तालुक्यातील ग्रामीण भागात पाणीटंचाईचा प्रश्न निर्माण होण्यापूर्वीच प्रशासनाने प्रत्यक्ष पाहणी करून उपाययोजनांचा आढावा घेतल्याने या दौऱ्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. आता केवळ सूचना देण्यापुरते मर्यादित न राहता संबंधित विभागांनी दुरुस्तीची कामे प्रत्यक्षात किती लवकर पूर्ण केली, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न हा नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित असल्याने प्रशासनाने याबाबत कोणतीही दिरंगाई करू नये, अशी अपेक्षा ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे.

या पाहणी दौऱ्यात तहसीलदार भागवत पाटील, नरखेड पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी खोरगे, पाणीपुरवठा विभागाचे उपविभागीय अभियंता सोनोने, लघुसिंचन विभागाचे चव्हाण, नारनवरे, मंडळ अधिकारी नाखले, प्रशासक दीपक जंगले, माजी सरपंच प्रवीण दहेकार, पोलीस पाटील निलेश ठाकरे, ग्रामपंचायत अधिकारी पल्लवी गाडगे यांच्यासह उमठा ग्रामपंचायतीचे पदाधिकारी, कर्मचारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

संभाव्य पाणीटंचाईच्या संकटावर मात करण्यासाठी प्रशासनाने केलेली ही प्रत्यक्ष पाहणी महत्त्वपूर्ण ठरणार असून, संबंधित विभागांनी दिलेल्या सूचनांची तातडीने अंमलबजावणी केल्यास आगामी उन्हाळ्यात ग्रामीण भागातील नागरिकांना मोठा दिलासा मिळू शकतो.

थोडक्यात

दहेगाव येथे संविधान दिवस उत्साहात साजरा, प्रभात फेरीने गावात जनजागृती



दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू:मौदा

पीएम श्री जि प उच्च प्राथमिक शाळा दहेगाव येथे २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी शाळेच्या वतीने गावातून प्रभात फेरी काढण्यात आली. विद्यार्थ्यांनी हातात फलक घेऊन समता, न्याय, स्वातंत्र्य, बंधुता, संविधान हाच आपला धर्म अशा घोषणा देत गावकऱ्यांमध्ये संविधानाबाबत जनजागृती केली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंचा भारती आंबिलदुके या होत्या. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून तंटामुक्ती अध्यक्ष भगवान आंबिलदुके, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नितेश इंगळे, केंद्रप्रमुख धानला राजू आंबिलकर उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक वासुदेव भुते यांनी केले. संचालन शिक्षक राजेश रोहाड यांनी तर आभार प्रदर्शन शिक्षक सुधीर कांबळे यांनी केले. प्रभात फेरीनंतर शाळेत संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी संविधानाचे महत्त्व सांगणारी भाषणे, गीते सादर केली. संविधानाने दिलेल्या हक्क व कर्तव्यांचे पालन करण्याची प्रतिज्ञा सर्वांनी घेतली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षकवृंद सुधीर खंडाईत, सुधीर कांबळे,राजेश रोहाड, सुजाता बोदेले, प्रज्ञा रामटेके, गीतांजली यादव,संगीता आंबिलदुके, कु.ज्योती आंबिलदुके, पुष्पा उके, उमेश उके, रंजना उके यांनी परिश्रम घेतले.

जि. प. प्रायमरी सेमी इंग्लिश स्कूल भोवरी येथे संविधान दिन उत्साहात साजरा



दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू:मौदा

विद्यार्थ्यांमध्ये संविधानाबद्दल आदर, राष्ट्रप्रेम आणि नागरिक म्हणून कर्तव्यांची जाणीव निर्माण व्हावी, या उद्देशाने जि प प्रायमरी सेमी इंग्लिश स्कूल भोवरी येथे गुरुवार(ता. २६ नोव्हेंबर) ला संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात भारतीय संविधानाच्या प्रस्तावनेचे सामूहिक वाचन करून करण्यात आली. विद्यार्थ्यांनी "आम्ही, भारताचे लोक..." ही प्रस्तावना एकाग्रतेने, समजपूर्वक आणि योग्य उच्चारांसह वाचली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान लिहिण्यासाठी केलेल्या कार्याची माहिती विद्यार्थ्यांना सोप्या भाषेत सांगण्यात आले.

या निमित्ताने शाळेत चित्रकला स्पर्धा तसेच संविधान अभ्यास स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. मुख्याध्यापक आणि शिक्षकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व संविधान मसुदा समितीच्या योगदानावर प्रकाश टाकत मूलभूत हक्क, कर्तव्ये आणि लोकशाही मूल्यांची माहिती विद्यार्थ्यांना दिली. 'माझे संविधान, माझा अभिमान', 'लोकशाहीचे स्तंभ' आणि 'एकता व बंधुता' या विषयांवर प्राथमिक गटात चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी रंगकाम आणि रेखांकनाच्या माध्यमातून संविधानाची उद्दिष्टे आणि भारतीय संस्कृतीचे विविध पैलू अत्यंत प्रभावीपणे मांडले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये संविधानाप्रती आदर आणि जागरूकता निर्माण झाल्याची भावना पालकांनी व्यक्त केली. याप्रसंगी केंद्रप्रमुख राजु आंबिलकर, शाळा व्यवस्थापन अध्यक्ष अंकुश निरगुळकर, उपाध्यक्ष प्रल्हाद वैद्य, मुख्याध्यापिका कु. पठाण तब्बसून, ग्रा प सदस्य काशिनाथ गिहेपुंजे, पोलिस पाटील प्रशांत वाडीभस्मे, ग्यानीवंत गिहेपुंजे, पांडुरंग गिहेपुंजे स्वयंपाकी शोभा बावणे आणि अंगणवाडी सेविका ज्योती वाडीभस्मे आणि मदतनीस सेजल बावणे उपस्थित होते.

खापरखेडा येथे 'सेवा दवाखान्याचे' आ. डॉ. आशिष देशमुख यांच्या हस्ते उद्घाटन



दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा

कोराडी व खापरखेडा परिसरातील विमाधारक व त्यांच्या कुटुंबियांना दजेदार आणि तत्पर आरोग्य सुविधा मिळाव्यात, या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या सेवा दवाखान्याचे उद्घाटन शुक्रवार, दिनांक २७ नोव्हेंबर २०२६ रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाले. माननीय आमदार डॉ. आशिष देशमुख यांच्या शुभहस्ते फित कापून या दवाखान्याचे लोकार्पण करण्यात आले. उद्घाटनप्रसंगी बोलताना आ. डॉ. आशिष देशमुख यांनी परिसरातील विमाधारक व त्यांच्या कुटुंबियांना आरोग्य सेवा बळकट होण्याची गरज व्यक्त केली. कोराडी व खापरखेडा भागातील विमाधारक रुग्णांना व त्यांच्या कुटुंबियांना आपल्याच परिसरात दर्जेदार आणि वेळेत उपचार मिळणे अत्यंत महत्त्वाचे आहे. सेवा दवाखाना या माध्यमातून या परिसरातील विमाधारक व त्यांच्या कुटुंबियांना मोठा दिलासा मिळेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. तसेच, दवाखान्याच्या पुढील वाटचालीस त्यांनी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमास वैद्यकीय प्रशासन अधिकारी डॉ. चारुदत्त साळवे, मुख्य प्रशासन अधिकारी विजय गोडे, कार्यालयीन अधीक्षक चारडे, वरिष्ठ लिपिक मुकेश सराफ, इतर कर्मचारी तसेच परिसरातील विमाधारक व त्यांचे कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाळजी शिंदे यांनी केले, तर आभार प्रदर्शन राहुल बागडे यांनी मानले.

तंत्रज्ञानाची गतिमानता व मर्यादा ओळखून न्यायदानाची जबाबदारी पार पाडावी

माजी सरन्यायाधीश भूषण गवई, मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात ॲम्फीथिएटरचे उद्घाटन, संविधान दिनानिमित्त विशेष व्याख्यानमालेचे आयोजन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर



तंत्रज्ञानाच्या युगात लोकशाहीच्या तिन्ही स्तंभांमध्ये अधिकारांचे संतुलन आणि विभाजन राखणे अत्यंत महत्त्वाचे आहे. तंत्रज्ञानाची गतिमानता व मर्यादा ओळखून न्यायदानाची प्रक्रिया पार पाडण्याची जबाबदारी न्यायव्यवस्थेवर असल्याचे प्रतिपादन भारताचे माजी सरन्यायाधीश भूषण गवई यांनी आज येथे केले. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठातील ॲम्फीथिएटरच्या उद्घाटनप्रसंगी ते यांनी केले. संचालन शिक्षक राजेश रोहाड यांनी तर आभार प्रदर्शन शिक्षक सुधीर कांबळे यांनी केले. प्रभात फेरीनंतर शाळेत संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी संविधानाचे महत्त्व सांगणारी भाषणे, गीते सादर केली. संविधानाने दिलेल्या हक्क व कर्तव्यांचे पालन करण्याची प्रतिज्ञा सर्वांनी घेतली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षकवृंद सुधीर खंडाईत, सुधीर कांबळे,राजेश रोहाड, सुजाता बोदेले, प्रज्ञा रामटेके, गीतांजली यादव,संगीता आंबिलदुके, कु.ज्योती आंबिलदुके, पुष्पा उके, उमेश उके, रंजना उके यांनी परिश्रम घेतले.

यांच्यासह उच्च न्यायालयाचे विद्यमान व माजी न्यायमूर्ती, न्यायिक अधिकारी तसेच नागपूर खंडपीठातील न्यायमूर्ती यांचीही कार्यक्रमास उपस्थिती होती.

उच्च न्यायालय परिसरातील मुख्य प्रवेशद्वाराच्या परिसरात आयोजित या सोहळ्यात संविधान दिनानिमित्त चिंतन व विशेष व्याख्यानमालेचेही आयोजन करण्यात आले.

यावेळी विधि क्षेत्रातील मान्यवरांनी मार्गदर्शन केले. 'तंत्रज्ञान आणि डिजिटल प्रशासनाच्या युगातील सत्तेचे पृथक्करण' या महत्त्वपूर्ण विषयावर गवई यांनी मार्गदर्शन केले. उद्घाटन सोहळ्यास सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती ए.एस. चांदूरकर, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती महेश चंद्र त्रिपाठी, मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे प्रशासकीय न्यायमूर्ती अनिल एस. किलोर, उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे न्यायमूर्ती अनिल पानसरे उपस्थित होते.

सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती व्ही. एस. सिरपूरकर, मुंबई उच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायमूर्ती श्री धर्माधिकारी आणि न्यायप्रशासनात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर वाढत असताना त्यासाठी नियामक चौकट आणि योग्य शासनयंत्रणा उभारणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

वास्तू निर्मितीतील महत्वाचे टप्पे

गवई यांनी, या वास्तूच्या ऐतिहासिक प्रवासात व नूतनीकरणाच्या वाटचालीत न्यायमूर्ती किलोर यांच्या विशेष योगदानाचा उल्लेख केला. अनेक टप्प्यांमध्ये ही वास्तू पूर्णत्वास आली. प्रशासकीय कारणास्तव अनेकदा यातील कामे अपूर्ण राहिली. ब्रिटीश काळात बांधकाम सुरू झालेली आणि स्वतंत्र भारतात पूर्ण झालेली ही एकमेव इमारत असल्याचे त्यांनी नमूद केले.

न्यायमूर्ती अनिल किलोर यांनी परिसरात नूतनीकरणाची अनेक कामे केलीत. बार असोसिएशनच्या भागाचे सुशोभीकरण करण्यात आले, विविध न्यायालयीन दालनांतील जुन्या तसबिरींचे डिजिटलायझेशन करण्यात आले. त्यांना प्रशासकीय अधिकार प्राप्त झाल्यानंतर या इमारतीत आमूलाग्र बदल घडून आले. या बदलांची माहिती देताना ते म्हणाले कॉरिडॉरमध्ये न्यायालयाची छायाचित्रे लावून ते आकर्षक करण्यात आले. दालनांचे सुशोभीकरण करण्यात आले असून मूळ वारसा जपत न्यायालयीन दालनांमध्ये मोठे परिवर्तन घडवून आणण्यात आले. एम्फीथिएटरच्या निर्मितीमुळे यास पूर्णत्व आल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

न्या.महेश चंद्र त्रिपाठी यांनी 'संविधान आणि पर्यावरण संरक्षण: निसर्गाच्या कित्तीवर विकास शक्य आहे का?' या विषयावर मार्गदर्शन केले. यजुर्वेदातील शांती प्रार्थनेचा उल्लेख करत त्यांनी निसर्गाचे रक्षण आणि मानवी कल्याण यांचा अविभाज्य संबंध अधोरेखित केला. निसर्गाचा नाश करून विकास साधता येणार नाही. निसर्ग व भौतिक विकासाचा समतोल मानवाला साधावाच लागेल. पर्यावरणीय संकटांचे अनेक दाखले देत त्यावर तातडीने उपाययोजना करण्याची गरज स्पष्ट केली. न्यायालयीन विविध खटल्यांचा संदर्भ देत पर्यावरण रक्षणाची जबाबदारी त्यांनी स्पष्ट केली.

न्या. ए. एस. चांदूरकर यांनी ह्यरिअल टाइम बातम्यांच्या युगातील माध्यम नीतिशास्त्र आणि न्यायिक स्वातंत्र्य' यावर संवाद साधला. ते म्हणाले, न्यायव्यवस्था आणि प्रसारमाध्यमे हे लोकशाहीचे स्वतंत्र आणि महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत. प्रसारमाध्यमांना अभिव्यक्ती स्वातंत्र्य असले तरी 'मीडिया ट्रायल'मुळे न्यायदानात अडथळा येऊ नये किंवा पूर्वग्रह निर्माण होऊ नये, याची काळजी घेणे आवश्यक आहे. जनहितासाठी जबाबदार पत्रकारिता महत्त्वाची असली तरी सनसनाटी वृत्तांकन किंवा व्यावसायिक हितावा प्राधान्य दिले तर न्यायालयीन कामकाजावर परिणाम होऊ शकतो. अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि निष्पक्ष खटला यांत समतोल साधण्यावर भर त्यांनी दिला. न्यायव्यवस्थेच्या स्वातंत्र्याचा आणि प्रसारमाध्यमांच्या अधिकारांचा परस्पर आदर राखल्यास लोकशाही अधिक बळकट होईल आणि व्यापक जनहिताचे रक्षण होईल, असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

एम्फीथिएटर निर्मितीची संकल्पना डिसेंबर २०१८ मध्ये आकाराला आली. न्यायमूर्ती गवई व न्यायमूर्ती चांदूरकर यांच्या प्रोत्साहनामुळे या कामास गती मिळाली. संविधान केवळ कायदेशीर दस्तऐवज नसून लोकशाही व्यवस्थेचा पाया आणि संस्थांना दिशा देणारी शक्ती असल्याचे प्रशासकीय न्यायमूर्ती अनिल किलोर यांनी प्रास्ताविक करताना सांगितले.

दुष्काळग्रस्तांसाठी निधी

नायलॉन मांजाचा वापर, विक्री, साठवणूक व वाहतूक याप्रकरणी उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर यांनी त्या विरोधात वसुलीचे आदेश जारी केले. त्यातून २१ लक्ष एवढी रक्कम जमा झाली. हा निधी दुष्काळग्रस्तांना देण्यात येत असून २१ लक्षचा धनादेश श्री गवई यांनी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्याकडे सुपूर्द केला. संभाव्य दुष्काळी स्थितीचा सामना आपण सर्वांना मिळून करावा. या देशाचे जबाबदार नागरिक म्हणून आपण या परिस्थितीचा एकजुटीने सामना करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

मोठ्या पडद्यावर एम्फीथिएटरचे प्रक्षेपण करून उपस्थितांना याबाबत माहिती देण्यात आली. महापालिका आयुक्त डॉ विपिन इटनकर, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, बार कौन्सिलचे सदस्य, वरिष्ठ अधिवक्ते, उच्च न्यायालय बार असोसिएशन व जिल्हा बार असोसिएशनचे पदाधिकारी, महाधिवक्ता/ रजिस्ट्रार वकील, विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठाचे, प्रबंधक (प्रशासन) भूषण पी. क्षीरसागर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

संविधान दिनानिमित्त खापरखेडा परिसरातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा



विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव मंडळ, प्रकाशनगर वसाहत, खापरखेडा आणि रमाई महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान दिनानिमित्त गुरुवार, दिनांक २६ नोव्हेंबर २०२६ रोजी आझाद मैदान, प्रकाशनगर वसाहत येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी खापरखेडा परिसरातील गुणवंत विद्यार्थ्यांचा मेडल्स व ग्रंथ भेट देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी औष्णिक विद्युत केंद्र, खापरखेडा येथील मुख्य अभियंता डॉ. भूषण शिदि साहेब होते. प्रमुख उपस्थितीमध्ये अधीक्षक अभियंता विलासकुमार उके, डॉ.किरण भूषण शिदि तसेच शिल्पा विलास उके यांचा समावेश होता. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. डॉ. दयानंद गोगले हे उपस्थित होते.

आपल्या मार्गदर्शनपर भाषणात प्रा. डॉ. दयानंद गोगले सर यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व, संविधानाचे मूल्य, सामाजिक बांधिलकी आणि उज्ज्वल भविष्य घडविण्यासाठी आवश्यक असलेल्या जिद्द व चिकाटीबाबत मोलाचे मार्गदर्शन केले. गुणवंत विद्यार्थ्यांनी आपल्या यशातून समाजासमोर आदर्श निर्माण करावा, असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी खापरखेडा परिसरातील गुणवंत विद्यार्थ्यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते मेडल्स व प्रेरणादायी ग्रंथ भेट देऊन सन्मान करण्यात आला.

या सोहळ्याला प्रकाशनगर वसाहतीतील नागरिक, परिसरातील विद्यार्थी आणि त्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमानंतर संपूर्ण उपस्थितांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन मंडळातर्फे करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी वि. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मंडळाचे अध्यक्ष इंदलकुमार शामकुवर, सचिव मयूर वासनिक, कोषाध्यक्ष कुलदीप खोब्रागडे तसेच रमाई महिला मंडळाच्या अध्यक्षा दीक्षाताई वासनिक, सचिव प्रतीक्षा ताई तिखाडे आणि कोषाध्यक्ष वषाताई पौनिकर त्याचबरोबर मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक इंदलकुमार शामकुमार यांनी केले. सूत्रसंचालन प्रतीक्षा ताई तिखाडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन दीपक मेश्राम यांनी केले. संविधान दिनाच्या निमित्ताने गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करून त्यांना प्रोत्साहन देण्याचा त्याचबरोबर संविधान जागराचा हा उपक्रम अतिशय उत्साह पूर्ण वातावरणात संपन्न झाला.

जिल्हा क्रीडा पुरस्कारासाठी २४ डिसेंबरपर्यंत अर्ज करा

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

जिल्ह्यातील गुणवंत खेळाडू (पुरुष, महिला व दिव्यांग) तसेच क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या क्रीडा मार्गदर्शकांना सन २०२५-२६ चा जिल्हा क्रीडा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. यासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने पात्र उमेदवारांकडून २४ डिसेंबरपर्यंत प्रस्ताव मागविण्यात आले आहेत.

या पुरस्काराचे स्वरूप प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह आणि १० हजार रुपये असे आहे. खेळाडू पुरस्कारांतर्गत पुरुष, महिला व दिव्यांग अशा तीन गटांत, तर गुणवंत क्रीडा मार्गदर्शकासाठी स्वतंत्र पुरस्कार देण्यात येणार आहे. अर्जदाराचे महाराष्ट्रात सलग १५ वर्षे वास्तव्य असणे आवश्यक आहे. तसेच खेळाडू व मार्गदर्शकांसाठी शासनाने निश्चित केलेल्या पात्रता व अटी लागू राहतील. इच्छुकांनी विहित नमुन्यातील परिपूर्ण अर्ज २४ डिसेंबर २०२६ पर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, विभागीय क्रीडा संकुल, मानकापूर, नागपूर येथे कार्यालयीन वेळेत सादर करावेत. अधिक माहितीसाठी क्रीडा अधिकारी अनिल बोरवार (९४२२१५९०८३) यांच्याशी संपर्क साधावा. मुदतीनंतर प्राप्त अर्जांचा विचार केला जाणार नसल्याचे जिल्हा क्रीडा अधिकारी शशिकांत कळंबे यांनी कळविले आहे.

महावितरणच्या अभय योजनेमध्ये ५४ हजार वीजग्राहकांचा सहभाग; 'अर्ली बर्ड' सवलतीसाठी आता २० दिवस शिल्लक

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

कायमस्वरूपी व तात्पुरता वीजपुरवठा खंडित झालेल्या बिगरकृषी वीजग्राहकांना थकबाकीमुक्त करण्यासाठी महावितरणने सुरू केलेल्या 'अभय योजना २०२६-२७' ला राज्यभरातून मोठा प्रतिसाद मिळत आहे. अवघ्या २० दिवसांत राज्यभरातील ५४ हजार ग्राहकांनी या योजनेत सहभाग घेतला असून ८ कोटी ५३ लाख रुपयांचा भरणा केला आहे. दरम्यान, मूळ थकबाकीमध्ये २० टक्क्यांपर्यंत सवलत देणाऱ्या अर्ली बर्ड मुदतीसाठी येत्या १५ डिसेंबरपर्यंत आता फक्त २० दिवस शिल्लक आहेत.

लघु व उच्चदाबाच्या घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक व इतर बिगरकृषी ग्राहकांना मोठा दिलासा देणारी ही योजना येत्या १५ जानेवारी २०२७ पर्यंत सुरू राहणार आहे. थकबाकीमुक्तीसाठी घसघशीत सवलतींचा समावेश असणाऱ्या अभय योजनेअंतर्गत एकूण थकबाकीमधील संपूर्ण व्याज आणि विलंब आकार तसेच मागणी आकार / स्थिर आकार १०० टक्के माफ करण्यात येत आहे. यासह मागणीनुसार नवीन वीजजोडणी किंवा पुनर्जोडणी देखील तात्काळ मिळणार आहे. तसेच सर्व ग्राहकांसाठी नवीन वीजजोडणी किंवा पुनर्जोडणी शुल्क आणि लघुदाब ग्राहकांसाठी सर्व्हिस कनेक्शन शुल्क पूर्णपणे माफ करण्यात येत आहे. योजनेत मूळ थकबाकीची रक्कम एकाचवेळी किंवा व्याजमुक्त हप्त्यांनी भरण्याची सुविधाही उपलब्ध आहे.

अर्ली बर्ड सवलतीचा लाभ घेण्यासाठी २० दिवसांची संधी- अभय योजना सुरू झाल्यापासून दि. १५ डिसेंबरपर्यंत मूळ थकबाकीचा एकरकमी भरणा करणाऱ्या ग्राहकांसाठी विशेष अर्ली बर्ड रिबेट देण्यात येत आहे. या सवलतीच्या लाभासाठी आता केवळ २० दिवसांचा कालावधी शिल्लक आहे. लघुदाब घरगुती व व्यावसायिक ग्राहकांना वीजजोडणी खंडित राहण्याच्या कालावधीनुसार १० ते २० टक्क्यांपर्यंत, तर इतर लघु व उच्चदाब ग्राहकांना १० ते १५ टक्क्यांपर्यंत सूट मिळत आहे. तसेच मंजूर भार २० किलोवॉटपर्यंत असलेल्या ग्राहकांनी पुनर्जोडणीच्या वेळी प्रीपेड स्मार्ट मीटरचा पर्याय निवडल्यास मूळ थकबाकीत आणखी ५ टक्के अतिरिक्त सवलत मिळणार आहे व ती रक्कम थेट प्रीपेड मीटर खात्यात जमा होणार आहे.

अभय योजनेत आतापर्यंत ५४ हजार ३२५ थकबाकीदार ग्राहकांनी सहभाग घेतला आहे. संपूर्ण व्याज, विलंब आकारासह मागणी/स्थिर आकार १०० टक्के माफ झाल्यानंतर उर्वरित मूळ थकबाकीमधील ८ कोटी २७ लाख रुपयांचा भरणा करण्यात आला आहे. याभरे सर्वाधिक कोकणातून प्रतिसाद मिळाला असून कोकण प्रादेशिक विभागातील १९ हजार ६२८ थकबाकीदारांनी सहभागी होत १ कोटी ८६ लाख रुपयांचा भरणा केला आहे. त्यानंतर छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक विभागातील १६ हजार ८२ थकबाकीदारांनी २ कोटी ५७ लाख, पुणे प्रादेशिक विभागातील १३ हजार २२६ थकबाकीदारांनी २ कोटी ५२ लाख आणि नागपूर प्रादेशिक विभागातील ५ हजार ३८९ थकबाकीदारांनी १ कोटी ३४ लाख रुपयांचा भरणा केला आहे. अभय योजनेत सहभागी होण्यासाठी महावितरणच्या www.mahadiscom.in या अधिकृत संकेतस्थळावर किंवा मोबाईल ॲपद्वारे घरबसल्या अर्ज करण्याची सोय उपलब्ध आहे. उर्वरित २० दिवसांत अर्ली बर्ड सवलतीचा जास्तीत जास्त बिगरकृषी थकबाकीदार ग्राहकांनी लाभ घ्यावा आणि अधिक माहितीसाठी नजीकच्या महावितरण कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

थोडक्यात

'जागर संविधानाचा' उपक्रमातून भव्य प्रभात फेरी

उद्देशिकेचे सामूहिक वाचन करून लोकशाही मूल्यांचा जागर, जनसागराचा उत्स्फूर्त प्रतिसाद



दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेड

संविधानाने दिलेले अधिकार, स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेची मूल्ये समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहचविण्याचा उद्देशाने झिंगाबाई टाकळीत येथील गणपती नगर परिसरात संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. भारतीय संविधानाप्रती आदरभाव व्यक्त करण्यासोबतच नागरिकांमध्ये घटनात्मक मूल्यांची जाणीव निर्माण करण्यासाठी आयोजित जागर संविधानाचा या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.रमाई भीम बुद्ध विहार समिती, गणपती नगर यांच्या पुढाकाराने गुरुवार, २६ नोव्हेंबर रोजी भव्य संविधान प्रभात फेरी काढण्यात आली. हातात भारतीय संविधानाच्या पुस्तिका घेऊन महिला, पुरुष आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने या फेरीत सहभागी झाले होते. संविधानाचा जयघोष आणि लोकशाही मूल्यांचा संदेश देत निघालेल्या या प्रभात फेरीमुळे संपूर्ण परिसर संविधानमय झाला होता. विशेषतः भारतीय संविधानाच्या पुस्तिकेची साकारलेली भव्य प्रतिकृती नागरिकांचे लक्ष वेधून घेत होती.

प्रभात फेरीनंतर आयोजित कार्यक्रमात भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. संविधानातील तत्त्वे केवळ पुस्तकांपुरती मर्यादित न राहता ती प्रत्येक नागरिकाच्या आचरणात उतरली पाहिजेत, असा संदेश यावेळी देण्यात आला.

कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून रणजीत बागडे, कॅप्टन चक्रपाणी, डॉ. मीनाक्षी वासनिक आणि भारती भांगे उपस्थित होते. मान्यवरांनी आपल्या मार्गदर्शनातून संविधान निर्मितीचा इतिहास, नागरिकांचे मूलभूत अधिकार, कर्तव्ये तसेच लोकशाही व्यवस्थेतील संविधानाचे अनन्यसाधारण स्थान विशद केले. संविधानाचे संरक्षण आणि त्यातील मूल्यांचे संवर्धन करणे ही प्रत्येक भारतीयाची सामूहिक जबाबदारी असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.सोनुले मॅडम यांनी आभार प्रदर्शनातून कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य करणाऱ्या सर्वांचे ऋण व्यक्त केले. राष्ट्रगीताने या उपक्रमाची सांगता झाली. संविधान दिनाच्या निमित्ताने राबविण्यात आलेल्या या उपक्रमातून परिसरात सामाजिक एकता, समता आणि बंधुतेचा संदेश प्रभावीपणे पोहोचला.

आशी येथील २८ वर्षीय तरुणाच्या हत्येप्रकरणी एकाला अटक

आरोपी गणेश बाहुरे याला न्यायालयाने दिली ३० तारखेपर्यंत पोलीस कोठडी

दै. सिंहवाणी वृत्त, वरोरा-धर्मेंद्र शेरकुरे

शेतात कामावर जाणे बंद केल्याचा आणि जुन्या वादाचा राग मनात धरून एका २८ वर्षीय शेतमजूर तरुणाला रात्री घरातून बोलावून घेतल्यानंतर अमानुष मारहाण करून त्याचा खून केल्याची थरकाप उडवणारी घटना वरोरा तालुक्यातील आशी शिवारात उडकीस आली आहे. या प्रकरणातील संशयित आरोपी गणेश बाहुरे याला आज दिनांक २७ ला वरोरा न्यायालयात हजर करण्यात आले वरोरा पोलीसांनी पोलीस कोठडीची मागणी केली असता जिल्हा सत्र न्यायालयाने आरोपीला ३० तारखेपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.या क्रूर घटनेमुळे संपूर्ण वरोरा तसेच आशी परिसरात संतापाची लाट उसळली आहे .फिर्यादी प्रदीप बालाजी काळे वय ४५ राहणार आशी तालुका वरोरा जिल्हा चंद्रपूर हे मजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवतात त्यांना एक मुलगा व एक मुलगी असून त्यांचा २८ वर्षीय मुलगा गणेश प्रदीप काळे हा शेतमजुरी करत होता. वरोरा येथील संशयित आरोपी गणेश बाहुरे रा. यशोदा नगर पाण्याच्या टाकीजवळ ता.वरोरा जिल्हा चंद्रपूर याने दोन वर्षांपूर्वी बालाजी गोवारदिपे यांची शेती विकत घेऊन ती ताब्यात घेतली. तिथे तो त्या शेतामध्ये देशी दारू विक्रीचा अवैध व्यवसाय करत असल्याची माहिती समोर आली आहे.

चालू वर्षात मृतक गणेश काळे हा गणेश बाहुरे यांच्या शेतात मजुरीला जात असे मात्र मुलाने त्यांच्या शेतात जाऊन काम करणे वडिलांना पसंत नसल्याने त्यांनी गणेशला तेथे कामावर जाण्यास मज्जाव केला होता.त्यानंतर गणेश बाहुरे यांच्या शेतात कामावर जाणे बंद केले होते, याच पार्श्वभूमीवर दिनांक १३ नोव्हेंबर २०२६ रोजी प्रदीप काळे शेतातून घरी परतत असताना विजू परचाके यांच्या पाणठेला समोरील रस्त्यावर गणेश बाहुरे हा गणेश काळे यांच्याशी वाद घालून त्याला मारहाण करताना दिसला त्यावेळी मुलाला सोडवण्यासाठी मध्ये गेलेल्या प्रदीप काळे यांनाही गणेश बाहुरे ने ढकलत हातातील काठीने डोक्यावर मारहाण करून दुखापत केली होती तेव्हापासून गणेश बाहुरे हा वडील व मुलाचा राग मनात धरून होता दरम्यान दिनांक २५ नोव्हेंबर २०२६ रोजी प्रदीप काळे शेतात काम करत असताना त्यांच्या मोबाईलवर गणेश बाहुरे याने फोन केला मृतक गणेश हा फवारणीच्या कामासाठी राजू नादे यांच्या शेतात गेल्याचे वडिलांनी सांगितले त्यावर गणेश बाहुरे ने संध्याकाळी फोन करण्यास सांगितले होते.सायंकाळी ६.३० वाजता घरी आल्यानंतर प्रदीप काळे यांनी मुलाला गणेश बाहुरेचा फोन आल्याचे सांगून मोबाईल दिला त्यानंतर गणेशने गणेश बाहुरे ला फोन केला मात्र दोघांमध्ये काही काय बोलणे झाले याची माहिती वडिलांना नव्हती ,त्यानंतर गणेश बाहुरे हा काही वेळातच प्रदीप काळे यांच्या मोबाईलवर वारंवार फोन करत होता. रात्री ८.३० वाजता कुटुंबियांनी एकत्र जेवण केले आणि रात्री ९ वाजताच्या सुमारास मुलगा गणेश मोबाईल घेऊन घराबाहेर पडला पहाटे चार वाजता प्रदीप काळे झोपेतून उठून पाहतात तर मुलगा घरी परतलेला नव्हता त्यानंतर सकाळी ७ वाजताच्या सुमारास गावातील प्रमोद झाडे यांनी राजू नदि यांच्या मोबाईलवर फोन करून गणेश हा धनराज आसेकर रा वरोरा यांच्या शेतात पडून असल्याची माहिती दिली राजू नदि यांनी तातडीने घरी जाऊन ही बाब प्रदीप काळे यांना सांगितली त्यानंतर प्रदीप काळे व राजीव नदि यांनी धनराज आसेकर यांच्या आशी येथील शेत शिवारात जाऊन पाहिले असता कपाशीच्या पिकात गणेश हा मृत अवस्थेत आढळून आला व त्यांच्या शरीरावर महाराणीच्या खुणा दिसून आल्या.

एआयचा वापर मानवी क्षमतांना पूरक ठरावा, पर्याय नव्हे

प्रधान सचिव ब्रिजेश सिंह, एआयच्या वापरात सुशासन, पारदर्शकता आणि मानवी हस्तक्षेप महत्वाचा असल्याचे प्रधान सचिव ब्रिजेश सिंह यांचे मत

दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई

कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर करताना मानवी क्षमतांना पर्याय निर्माण करण्याऐवजी त्या अधिक सक्षम करण्यावर भर दिला पाहिजे. शासनाच्या निर्णय प्रक्रियेत एआयचा वापर सहाय्यक म्हणून व्हावा; मात्र महत्वपूर्ण निर्णय घेताना मानवी हस्तक्षेप आणि पडताळणी अनिवार्य असावी. एआयचा वापर सार्वजनिक हित, जबाबदारी आणि सुशासनाच्या तत्वांवर आधारित असणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन माहिती व जनसंपर्क विभागाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी केले.

हॉटेल आयटीसी ग्रँड सेंट्रल, परळ येथे आयोजित 'एआय ट्रान्सफॉर्मेशन कॉन्क्लेव्ह'मध्ये ते बोलत होते. यावेळी मुख्यमंत्र्यांचे आर्थिक सल्लागार तथा 'मित्रा'चे



सीईओ प्रवीण परदेशी, सर्विस नाऊच्या वरिष्ठ संचालक गरिमा बब्बर, ओपन टेक्स्टचे देश संचालक मनीष बलूजा, डेलॉइट इंडियाचे पार्टनर जय गुहा, गव्हकनेक्टचे संचालक फहीम हक तसेच केंद्र व राज्य शासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

शासनाच्या कामकाजात एआयचा वापरचे महत्व स्पष्ट करताना प्रधान सचिव ब्रिजेश सिंह यांनी महाराष्ट्र शासनाच्या 'महा एआय' या स्थानिक पातळीवर होस्ट केलेल्या सर्वम मॉडेलचा अनुभव सांगितला. मसुदा तयार करताना या मॉडेलची मदत घेतली. शासन निर्णय, पूर्वीचे संदर्भ, प्रशासकीय तरतुदी, खर्चाच्या मर्यादा आणि विविध भाषांमधील जनसंपर्काचे स्वरूप यांची माहिती उपलब्ध असल्यामुळे या प्रणालीने उपयुक्त मसुदा तयार करून दिला. त्यामुळे प्रशासकीय अधिकाऱ्यांना संदर्भ शोधणे आणि प्राथमिक मसुदा तयार करणे अधिक सुलभ होऊ शकते. तथापि, अंतिम मसुद्याची पडताळणी आणि मान्यता ही अधिकाऱ्यांनीच करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

डिजिटायझेशनपासून डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चरपर्यंतच्या भारताच्या प्रवासाचा उल्लेख करताना त्यांनी आधार, यूपीआय आणि डिजीयात्रा यांसारख्या सुविधांचे उदाहरण दिले. देशाने उभारलेली डिजिटल सार्वजनिक पायाभूत व्यवस्था ही जागतिक स्तरावर आदर्श ठरली असून, आता त्यावर संमती आधारित व्यवस्था आणि एआय सक्षम व्यवहार प्रणाली विकसित करण्याची संधी भारतासमोर असल्याचे त्यांनी सांगितले.

एआयमुळे रोजगाराच्या संधी कमी होण्याबाबत भूमिका मांडताना ब्रिजेश सिंह म्हणाले की, भारतासारख्या मोठ्या लोकसंख्येच्या देशात मानवी श्रम आणि कौशल्यांना महत्व आहे. 'डार्क फॅक्टरी' किंवा चालकविरहित वाहनांसारख्या संकल्पनांचा स्वीकार करताना देशाच्या सामाजिक आणि आर्थिक गरजांचा विचार करणे आवश्यक आहे. एआयने माणसाची जागा घेण्याऐवजी त्याच्या कामाची गुणवत्ता, कार्यक्षमता आणि निर्णयक्षमता वाढविण्यास मदत केली पाहिजे. एआयच्या वापरातील संभाव्य धोके स्पष्ट करताना त्यांनी ऑस्ट्रेलियातील 'रोबोडेब्ट' प्रकरणाचा उल्लेख केला. कल्याणकारी योजनांमधील लाभार्थ्यांची स्वयंचलित पडताळणी करताना एआय प्रणालीतील त्रुटींमुळे चुकीच्या नोटिसा पाठविण्यात आल्या आणि अखेर ही प्रक्रिया बंद करावी लागली. त्यामुळे महत्वपूर्ण शासकीय निर्णय पूर्णपणे एआयवर सोपविणे धोकादायक ठरू शकते. एआयने दिलेल्या निष्कर्षांची मानवी स्तरावर पडताळणी करूनच निर्णय घेणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले.

महाराष्ट्रात सुरू असलेल्या 'महा क्राइम ओएस' या प्रायोगिक उपक्रमाची माहिती देताना त्यांनी सांगितले की, गुन्हेगारीच्या घटनांमध्ये विशिष्ट पद्धती आणि प्रवृत्ती आढळतात. वाहनचोरी, घरफोडी, पाकीटमारी यांसारख्या गुन्ह्यांच्या कार्यपद्धतींचे विश्लेषण एआयच्या मदतीने करता येऊ शकते. या प्रणालीद्वारे विचारलेल्या प्रश्नांना माहितीच्या आधारे उत्तरे मिळू शकतात. मात्र, त्यांची सत्यता तपासून पुढील जबाबदार निर्णय घेण्याची भूमिका मानवी अधिकाऱ्यांचीच असेल.

शासकीय यंत्रणांमध्ये एआयचा वापर करताना त्याची खरेदी, स्वदेशी अथवा परदेशी तंत्रज्ञानाची निवड, स्वतः प्रणाली विकसित करणे की उपलब्ध प्रणाली स्वीकारणे, संगणकीय क्षमता आणि संसाधनांचे योग्य नियोजन या बाबींचा जोखमीच्या दृष्टिकोनातून विचार करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले.

भाषणाचा शेवट करताना ब्रिजेश सिंह म्हणाले, 'एआयचा वापर जबाबदारीने, जोखमींचे मूल्यमापन करून आणि सार्वजनिक हिताला केंद्रस्थानी ठेवून करणे, हाच एआय सुशासनाचा मूलमंत्र आहे,'

एन.टी.पी.सी. मौदा कंत्राटी नोकरी फसवणूक प्रकरण

दोन आरोपींची तुरुंगात रवानगी, मुख्य आरोपीला दोन दिवसांची वाढीव पोलीस कोठडी, तपासादरम्यान पोलिसांकडून ५ लाख रुपयांची रोकड जप्त, आणखी धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता!

दै. सिंहवाणी वृत्त, मौदा

एन.टी.पी.सी.मौदा वीज निर्मिती केंद्रात कंत्राटी कामगार म्हणून नोकरीला लावून देण्याचे आमिष दाखवून तब्बल १० लाख ७५ हजार रुपयांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या टोळीतील दोन आरोपींची न्यायालयाने तुरुंगात रवानगी केली आहे तर प्रकरणातील मुख्य मास्टरमाइंड आरोपीला सोमवार३० नोव्हेंबरपर्यंत वाढीव पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. याप्रकरणी मौदा पोलिसांनी ५ लाख रुपये जप्त केले आहेत.

मौदा तालुक्यातील नंदापुरी येथील रहिवासी मंथन प्रकाश मलेवार वय २३ यांनी मौदा पोलीस ठाण्यात २३ नोव्हेंबर रोजी तक्रार दाखल केली होती मुख्य आरोपी बलवंत विलास साठवणे (वय ३४, रा. दाबा, ता. जि. भंडारा) याने त्याचे साथीदार मुकेश मोरेश्वर धावडे (वय ३५, रा. निलज खंडाळा, ता. पारशिवनी) नांदकिशोर भीमराव गायकवाड (वय ४४, रा. वार्ड क्र. ०३, खापरखेडा, ता. सावनेर) यांच्या मदतीने एन.टी.पी.सी. मौदा वीज निर्मिती केंद्रात कंत्राटी कामगार म्हणून कामावर लावून देण्याचे आमिष दाखवले आमिषाला बळी पडलेल्या फिर्यादीसह एकूण १२ जणांकडून आरोपींनी वेळोवेळी रोख व ऑनलाईन स्वरूपात १० लाख ७५ हजार रुपये उकळले होते.

तक्रारीवरून मौदा पोलिसांनी आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३१६(२), ३१८(४) आणि ६१(१)(ए) अन्वये गुन्हा दाखल करून तिघांना अटक केली होती न्यायालयाने त्यांना सुरुवातीला पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली होती. पोलीस कोठडीची मुदत संपल्याने २७ नोव्हेंबर शुक्रवारला तिन्ही आरोपींना न्यायालयात हजर करण्यात आले यावेळी न्यायालयाने आरोपी मुकेश धावडे व नंदकिशोर गायकवाड यांची तुरुंगात रवानगी केली तर मुख्य आरोपी बलवंत साठवणे याला ३० नोव्हेंबरपर्यंत दोन दिवसांची सोमवार पर्यंत वाढीव पोलीस कोठडी सुनावली आहे.

पोलीस कोठडी दरम्यान मौदा पोलिसांना फसवणुकीच्या रकमेपैकी ५ लाख रुपये जप्त करण्यात पोलिसांना यश आले असून फसवणुकीचे आणखी काही धागेदोरे उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे.

पोलिसांचे नागरिकांना आवाहन!

शासकीय, निमशासकीय किंवा खासगी व कंत्राटी नोकरी मिळवून देण्याच्या कोणत्याही खोट्या आमिषांना नागरिकांनी बळी पडू नये तसेच अनोळखी व्यक्ती किंवा मध्यस्थांच्या सांगण्यावरून कोणतेही आर्थिक व्यवहार करू नयेत. घटनेतील आरोपींकडून आणखी कोणाची फसवणूक झाली असल्यास त्यांनी तात्काळ मौदा पोलिसांशी संपर्क साधावा असे आवाहन मौदा पोलिसांतर्फे करण्यात आले आहे.

कोंढाळी डॉजबॉल संघाने तिहेरी विजेतेपद पटकाविले

शालेय राज्य स्पर्धेत करिता तीन मुलामुलींचे संघाची निवड



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

महाराष्ट्र राज्य क्रीडा संचनालय पुणे द्वारा आयोजित शालेय डॉजबॉल स्पर्धा गोंदिया येथे पार पडल्या. लाखोटीया भुतडा विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय कोंढाळी येथील संघाने सदर स्पर्धेत १९ वर्ष वयोगटातील दोन्ही मुलामुलींचे व १७ वयोगटात मुलांचे संघाने एकतर्फी विजय संपादित करून स्पर्धेचे सामाविक विजेतेपद खेचून आणण्याची परंपरा कायम ठेवली. विजयामुळे शाळेचे ३६ खेळाडू राज्य स्पर्धेत पात्र ठरले आहे.

अंतीम सामन्यात १९ मुलांनी वर्धा संघाला यांना २१/२ अशा अंकाने तर १७ वर्षातील मुलांनी वर्धा संघासोबत फायनल सामना झाला त्यांनी ७/२६ फरकाने एकतर्फी विजय संपादित केला. संघाला प्रशिक्षक भूषण राचलवार व माजी खेळाडुंचे मार्गदर्शन लाभले. भरीव सुयशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष रेखा राठी, सचिव डॉ श्यामसंदरजी लद्धड सर्व व्यवस्थापक मंडळ, प्राचार्य कैलास थुल, शिक्षक व कर्मचारी वृंदांनी अभिनंदन केले आहे.

आनंदसागर बारजवळ अपघात, पसार झालेल्या पिकअप वाहनाला खापा पोलिसांनी पकडले, युवक गंभीर जखमी

दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर

दिनांक २७ नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी १ वाजताच्या सुमारास तालुक्यातील पोलीस स्टेशन खापा हद्दीतील आनंदसागर बारजवळ पिकअप वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वार गंभीर जखमी झाल्याची घटना घडली. या घटनेची माहिती इमरान यांनी सामाजिक कार्यकर्ते हितेश बनसोड यांना दिली. माहिती मिळताच हितेश बनसोड यांनी तात्काळ खापा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक चंद्रकांत काळे यांना कळविले. त्यानंतर पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले. हितज्योती आधार फाउंडेशनच्या टीमच्या मदतीने जखमीला तातडीने सावनेर शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. जखमीच्या पायाला गंभीर दुखापत असल्याने प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी नागपूर येथील मेडिकल रुग्णालयात रवाना करण्यात आले.

जखमीचे नाव भूषण घायवट, रा. कोच्ची, खापा असे आहे. तो



आपल्या मित्राच्या भाजीपाला दुकानासाठी लाईटची बॅटरी आणून देण्यासाठी जात असल्याची माहिती मिळाली आहे. त्याच्या दुचाकीवर १५ वर्षांचा एक मुलगाही होता. सुदैवाने त्याला कोणतीही दुखापत झाली नाही. मिळालेल्या माहितीनुसार, भूषण हा सावनेरच्या दिशेने जात असताना पिकअप वाहनाने त्याच्या दुचाकीला धडक दिली. त्यानंतर वाहन बडेगावच्या दिशेने निघून गेले. अपघाताची माहिती मिळताच खापा पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवली आणि पिकअप वाहन याला तात्काळ पकडले.

दुष्काळाचा सामना करण्यासाठी पीक आणि पाणी नियोजन महत्त्वाचे

जलपरिषदेत विविध मान्यवरांनी व्यक्त केले मत

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

महाराष्ट्रात यंदा सरासरीपेक्षा सुमारे २० टक्के कमी पाऊस झाला असून, उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करणे आवश्यक आहे. पिण्याचे पाणी आणि पशुधनासाठी पाणी व चारा यांना प्राधान्य देऊन त्यानंतर शेतीसाठी पाण्याचे नियोजन केले पाहिजे, असे मत आयसीआरआयएसएटीचे महासंचालक डॉ. हिमांशु पाठक यांनी व्यक्त केले.

दुष्काळाचा सामनाः पाणी व्यवस्थापन आणि पीक नियोजन या मध्यवर्ती संकल्पनेवर आधारित मध्य भारतातील सर्वात मोठे कृषी प्रदर्शन ॲग्रोव्हिजन २०२६ मध्ये आयोजित जलपरिषदेत ते बोलत होते. यात डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोलाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख, कै. वसंतराव नाईक शेतकरी स्वावलंबी मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हलोंडे पाटील व विदर्भ भूषण संदीप शिरखेडकर यांनी सहभाग नोंदवला.

बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर पीक आणि पाण्याच्या नियोजनाचे महत्त्व स्पष्ट करताना ते म्हणाले, कमी पाण्यात येणाऱ्या पिकांची निवड, ब्लॉकनिहाय पीक नियोजन आणि शेतकऱ्यांना योग्य वेळी बियाणे उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. स्थानिक परिस्थितीनुसार आणि प्रत्यक्ष वेळेतील माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर केला पाहिजे. केंद्र व राज्य सरकारच्या योजनांमध्ये जलकेंद्रित दृष्टिकोन असावा. शासन, कृषी विद्यापीठे आणि संशोधन संस्थांनी एकत्रित प्रयत्न केल्यास दुष्काळाच्या आव्हानावर मात करता येईल, असा विश्वास हिमांशु पाठक यांनी व्यक्त केला.

विदर्भ भूषण संदीप शिरखेडकर यांनी तामसवाडा पॅटर्न आणि रामटेक पॅटर्नमधील जलसंवर्धनाच्या प्रयोगांची



माहिती सादरीकरणाद्वारे दिली. आशिष जयस्वाल आणि चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकारातून रामटेक पॅटर्नअंतर्गत ताडपत्री बंधाऱ्यांची उभारणी करण्यात येत आहे. लोकसहभागातून राबविण्यात येत असलेल्या या उपक्रमात राजकीय नेतृत्व, शेतकरी, स्वयंसेवी संस्था, सीएसआर आणि शासन यांचा सहभाग महत्त्वाचा ठरला आहे, असे ते म्हणाले.

डॉ. शरद गडाख यांनी कृषी विद्यापीठामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. या उपक्रमांमुळे शेतक-यांसोबतच विद्यापीठालादेखील मोठा फायदा झाल्याचे ते म्हणाले. निलेश हेलोंडे पाटील यांनी चारा व्यवस्थापन पशुधनासाठीची माहिती दिली. विविध ठिकाणी कशी चारा लागवड करण्यात आली व शेतकऱ्यांना त्याचा कसा लाभ झाला, याची माहिती त्यांनी दिली.